संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Hero GIFT Grand Indian Festival of Trust

तडजोड नाही,
फक्त नवीन HF-Deluxe

फेस्टिव्ह एक्स शोरूम किंमत*
~~₹69,068*~~ ₹64,868*
(₹4000* कॅश डिस्काउंट सोबत)

कमी डाउन पेमेंट ₹1999* | EMI ₹3999* | व्याजदर 5.99%* | निवडक काईसवर कॅशबॅक ₹5000* | 98980 51581

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, गुरुवार दि. ३१.१०.२०२४ अंक नं. २०५ वर्ष ६७ वे दैनिक वर्ष ६१ वे ANR/022/2018-2020

यंदा दिवाळी राजपाल सोबत
खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!

खरेदी करा आणि जिंका

विश्वसनीय दरांची अखंड परंपरा
राजपाल™

संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2000300
नारायणगाव (02132) 242124
श्रीरामपूर (02422) 226020

CELEBRATING 34 Years ३४ वर्षे सेवा, विश्वास आणि गुणवत्तेची

आपणा सर्वांच्या विश्वासाच्या पाठबळावरच आम्ही ३५ वर्षे अर्थपूर्ण सेवा अविरत प्रदान करीत आहोत.. असाच दृढ विश्वास चिरंतर राहो हीच सदीच्छा...

दिपतेजाची आली दिवाळी.. नवसंकल्पांचे आले नवे वर्ष.. आनंदाने.. उत्साहाने स्वागत करु सहर्ष...

कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरसमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.
Email : kailasnagari@gmail.com

सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार आपणा सर्वांना ही दिपावली सुख-समृद्धीची व भरभराटीची जावो हीच शुभकामना...

दरमहा भरावयाची रक्कम

	१ वर्ष	२ वर्ष	३ वर्ष	४ वर्ष	५ वर्ष
रूपये ५००	मुदतीनंतर मिळणारी रक्कम	६३०० रु.	१३३२५ रु.	२१०५० रु.	३९६०० रु.	३९०५० रु.
रूपये १०००		१२६०० रु.	२६६५० रु.	४२१०० रु.	५९३०० रु.	७८१०० रु.

लाभांश १२%
भागभांडवल २६.८२ लाख
ठेवी १४.१९ कोटी

ठेवीदारांसाठी आकर्षक ठेव योजना

अल्पमुदत ठेव खाते
४६ दिवस ते १ वर्षाच्या आत
द.सा.द.शे. ९%

मुदत ठेव खाते
१३ महिने ते २ वर्ष द.सा.द.शे. १०%
२५ महिने ते पुढे द.सा.द.शे. १०.५०%

दामदुप्पट ठेव योजना ९० महिने | सोनेतारण कर्ज सुविधा १२ % | वाहन कर्ज योजना १५ %

श्री. रखमाजी निऱ्हाने, चेअरमन/ संस्थापक
श्री. चंद्रकांत औशीकर, व्हा. चेअरमन

संचालक मंडळ - श्री. सागर चवंडके, श्री. अनंत ओंशिकर, श्री. जगन्नाथ वहिरवाडे, श्री. अमोल निलाने, श्री. रोहिदास नामदे, श्री. रामा विधाते, सौ. उषाताई खताडे, श्रीमती जयश्री विडकर, श्री. संतोष थिवर, • श्री. शंकर मिसाळ (सेक्रेटरी)
• तडजोड, गाऱ्हाणे आणि तक्रार निवारण समिती - सुभाष दारुंकर, भंगावर सोनवणे
कर्मचारी वृंद - सचिन दिवटे, अजिंक्य कलागते, ऋषिकेश पासकंटी, गणेश भुजबळ

Ashwa

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN

राजमोती साबुदाणा
एकदा सुरुवातच साबुदाण्या
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाणा सुद्धा उपलब्ध !

आकर्षक पॅकींग मध्ये
बकलावा गिफ्ट बॉक्स
ड्रायफ्रुट चॉकलेट बॉक्स
ड्रायफ्रुट बॉक्स
मिक्स मिठाई
स्पे. बर्फी मिक्स
फराळ हॅम्पर
शुगर फ्री मिठाई

आता चाणक्य चौकात सुद्धा...
Since 1910
बम्बईवाला
मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
कापड बाजार, अ.नगर. । चाणक्य चौक, बुरूडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710
Asha

Sintex PVC DOORS

Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

VARMORA TILES • KERAKOLL • BARSYL • colortile • RAK • NIRALI • ICON



तुम्हीच ठरवा, तुमचा डिस्काऊंट
10% ते 100% मजुरीवर सुट*
दररोज जिंका सोन्याचे नाणे
• अटी लागू
शिंगवी ज्वेलर्स प्रा.लि.
जुना कापड बाजार, अ.नगर
8087343030
प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, अ.नगर.
8605500025
www.shingavijewellers.com

A.H. पोखरणा® ज्वेलर्स
लक्ष्मीपुजनाच्या हार्दिक शुभेच्छा!
जितके ग्रॅम सोनं तितकीच चांदी मोफत*
स्क्रॅच करा आणि मिळवा 10% ते 100% मजुरीवर सुट*
हिऱ्यांच्या दागिन्यांवर मिळवा 50% ते 100% मजुरीवर सुट*
• अटी लागू

Avinash D Shirapuri
शाखा नं १ - सर्जेपुरा, अ.नगर । मो. 83 53 050505
शाखा नं २ - सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अ.नगर । मो. 800 700 5001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्षे जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंढेचा

email - navamaratha@gmail.com

बळीचे राज्य येवो – महाराष्ट्र समृद्ध होवो

दिवाळीचं कौटुंबिक व वैयक्तिक स्तरावर मंगलमय वातावरण आहे. यंदा पाऊसपाणी चांगला व काहीसा अधिकच असल्याने वर्षभर पीकपाणी व पाण्याचा प्रश्न फारसा नसेल. यंदाचा दिवाळी पाडवा महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. मागील २०१९ च्या निवडणुकीनंतर राज्यात काय चाललंय? कुठल्या स्तरापर्यंत गलंय? सारी जनता पाहात आहे. सोसत आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर वैचारिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध पातळीवर आपले राज्य अग्रेसर होते. आजही बऱ्याच क्षेत्रात प्रगती असल तरी नैतिकता, विवेक, निष्ठा यांचं काय?

म्हणूनच यंदाची विधानसभा निवडणूक राज्याचे भविष्य ठरवणारी नव्हे तुम्हा–आम्हां सर्वांची भविष्य सांगणारी असेल.

राजकीय प्रामाणिकता, प्रगल्भता व विश्वासार्हता पुन्हा चांगल्या उंचीवर यावी लागेल. याचा फैसला मतदार करतीलच पण जनतेलाही परिपक्व होणे गरजेचे.

राज्यसत्ता स्थिर व सक्षम असली तरच विकास, प्रगती वेगाने होऊ शकते. सध्या सत्ता स्वार्थांध बनली आहे. तत्त्व, पक्षनिष्ठा मरणेनुसार ठरतेय. म्हणूनच आपणा सर्वांची जबाबदारी मोठी आहे.

प्रजेसाठी झटणाऱ्या, बळीराजासारखे सुखसमृद्धीचे राज्य असावे. त्या बळीराजाच्या राज्यात चोरी, दरोडा, जीवहिंसा, सुरापान, विश्वासघात ही ५ महापापे नव्हती. कोठेही आळशीपणा, अस्वच्छता, भ्रष्टाचार नव्हता. काय आताही सर्वदूर दया, दान, सण, उत्सव, उल्हास व नितीमत्तापूर्ण आनंदाचे राज्य येईल? चांगली आशा करणं एवढंच आपल्या हातात. त्यासाठी सर्वांनाच शुभेच्छा...

वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१

आदर्श दिवाळी !

प्रस्तावना – 'तमसो मा ज्योतिर्गमय' या श्लोकाचा अर्थ : 'हे भगवंता ! आपण मला असत्याकडून सत्याकडे,अंधकारातून प्रकाशाकडे न्यावे 'अशी प्रार्थना आहे.प्रत्येक प्राणिमात्रांची धडपड प्रकाशाकडे जाण्यासी असते. ज्या स्थितीत आहोत त्याच्या पुढील स्थितीत जाण्यासाठी, प्रगती करण्याकडे असते. अर्थात नकारात्मकते कडून सकारात्मकतेकडे जायचे असते. जीवनात सकारात्मकता शिकवणारा, प्रकाशाकडे वाटचाल करण्यास शिकवणारा सण म्हणजे दिवाळी.

सत्याच्या विजयाचे प्रतिक ! – प्रभू श्रीरामचंद्र हे १४ वर्षाचा वनवास पूर्ण करून दिवाळीच्या दिवशी अयोध्येत परत आले. प्रभू श्रीरामचंद्राच्या आगमनाने प्रजेला खूप आनंद झाला. त्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण अयोध्या नगरीत घरोघरी तुपाचे दिवे लावून आनंद व्यक्त करण्यात आला. प्रभू श्रीराम सत्याचे मूर्तिमंत रूप असल्याने त्यांचा विजय म्हणजे सत्याचाच विजय होता. या विजयाचा उत्सव म्हणून आपण दिवाळी दीपोत्सव, प्रकाशोत्सव म्हणून साजरी करतो.

सकारात्मकता वाढविणारा सण ! – दिवाळी जवळ येताच घर, दुकाने, आस्थापने, आपल्या आजूबाजूचा परिसर,शहर यांची स्वच्छता सुरु होते. जाळे जळमटे काढून रंगरंगोटी केली जाते. तुटक्या फुटक्या साहित्याची डागडुजी होते. त्यामुळे स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांसोबतच वातावरणातील सकारात्मकता वाढते. त्याचा प्रत्येक जिवाच्या मन आणि बुध्दीवर सकारात्मक परिणाम होतो. मनातील नकारात्मकता दूर होऊन आपल्याला आनंद प्राप्त होतो.

गुणवृद्धीसाठी लक्ष्मीपूजन ! – लक्ष्मीपूजन हे अश्विन अमावस्येला संध्यामाळी करतात. तसेच रात्री बारा वाजता अलक्ष्मी निःसारण करतात. शास्त्रानुसार लक्ष्मीपूजनामुळे पूजाकरणाऱ्याला लक्ष्मी तत्वाचा लाभ होतो. तो टिकवून ठेवण्यासाठी धर्माचरण करणे आवश्यक आहे. अधर्माची कास धरली किंवा कर्तव्यणा निर्माण झाला तर आपण स्थिर राहू शकत नाही. लक्ष्मी चंचल आहे ! असे म्हणतात, पण खरेच लक्ष्मी चंचल आहे का ? याचे उत्तर नाही असे आहे. ती नेहमीच भगवंताच्या अनुसंधानात स्थिर असते. जेथे अनुसंधान असते, जिथे धर्माचरण असते तिथे लक्ष्मी विराजमान होते. ऐश्वर्य, सौंदर्य, शांती, सत्य, समृद्धी आणि संपत्ती याची अधिष्ठात्री देवी श्री लक्ष्मी कमलासनावर विराजमान होऊन समुद्रमंथनातून आली. अशा या लक्ष्मीचे वर्षातून केवळ एकदा पूजन करून ती प्रसन्न होईल का ? ज्या प्रसन्न तेवायचे असेल तर कमळ ज्या प्रमाणे चिखलातून बाहेर येते त्या प्रमाणे स्वभाव दोषांचा चिखल दूर सारून धर्माचरण करायला हवे. असे धर्माचरण करीत ईश्वराच्या अनुसंधानात रममाण झाल्यास श्री लक्ष्मी हृदयकमळावर निश्चितच विराजमान होईल. तसेच धन धान्याच्या रूपात आपल्याजवळ स्थिर होईल. आपल्यातील दुर्गुण घालविण्यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे, तेच खऱ्या अर्थाने अलक्ष्मी निःसारण होय.

सांप्रत काळातील दिवाळीचे बदलते स्वरूप ! – सभ्यदिखे, आनंदाकडे, प्रकाशाकडे नेणारी दिवाळी आहे. परंतु, सद्य परिस्थिती बघता दिवाळी म्हणजे देवता, थोरपुरूष यांची चित्रे असणाऱ्या फटाक्याची आतशबाजी, चित्रपटातील गाण्यांनी रंगणारी दिवाळी पहाट, डोळ्यांना त्रासदायक आणि घातक ठरणाऱ्या चिनी दीपमाळा आणि आकाशदिवे यांचा झगमगाट या सगळ्यामुळे दिवाळीचे संपूर्ण स्वरूप बदलून गेले आहे. यामुळे नकारात्मकता वाढते आहे. त्या लक्ष्मीची घरात पूजा करतो तिचेच फोटो असलेले फटाके फोडून आपण चिंच्या करतो. हे योग्य आहे का ? अश्याने ती प्रसन्न होईल का ? घरात केलेल्या पूजेचा काही परिणाम न होता यातून देवतांचे विडंबन होणार आहे. या विडंबनातून होणारे पातक जर आपल्या कृतीतून घडल असेल तर ती पूजा फलित होईल का ? त्याचप्रमाणे अश्या चुकीच्या कृतीमुळे युवा पिढी समोर आपण काय आदर्श ठेवणार ? याचा विचार करायला हवा. स्वदेशी आणि पारंपरिक सहिष्यापेक्षा झगमगाट आणि इन्स्टंटपणके कल वाढतो आहे.हि परिस्थिती बदलायला हवी त्यामुळे आपल्याला दिवाळीचा खरा आनंद मिळू शकेल.

आदर्श दिवाळी साजरी करण्याचे ध्येय घेकया ! – देवता, थोरपुरुष यांच्या फटाक्यांची विक्री होत असल्यास हिंदूंनी एकत्र येऊन त्या विषयी प्रबोधन करायला हवे. आपल्या संपर्कातील येणाऱ्या बाल आणि युवकांचे प्रबोधन करायला हवे.दिवाळी पहाट मधे होणाऱ्या अशास्त्रीय आणि अश्लील गाण्यांच्या ऐवजी भावभक्ती तसेच देशप्रेम निर्माण करणाऱ्या गाण्यांसाठी आग्रह धरायला हवा.भावी पिढीचा कौशल्य विकास व्हावा, त्यांच्यात हिंदूधर्म – राष्ट्र – संस्कृती विषयी प्रेम आणि कृतज्ञता भाव निर्माण व्हावा यासाठी रांगोळी स्पर्धा, किल्ले स्पर्धा, परिसर स्वच्छता आणि सजावट स्पर्धा घ्यायला हव्या.शरीर आणि पर्यावरणावर घातक परिणाम करणारे विदेशी आणि चिनी उत्पादने न घेता स्वदेशी आणि हलाल मुक्त उत्पादने घेऊया. त्या विषयी स्वतः जागरूक राहून कृती करून इतरांनाही जागृत करायला हवे.

असी आदर्श दिवाळीच आपल्याला ' मृत्योर्मा अमृतं गमय'

अर्थ : मृत्यूपासून जीवनाकडे वाटचाल करायला शिकवते. त्यातूनच आपले जीवन अमृता समान आनंदी होत असते.

आपल्या कुलदेवतेचे स्मरण करून तिला प्रार्थना करूया,

'हे भगवंता! आपणच आमच्या कडून आदर्श दिवाळी यंदाच्या वर्षी पासून साजरी करवून घ्या. आमच्या वैयक्तिक उन्नती सोबतच राष्ट्र – धर्म यांच्या रक्षणासाठी आणि उन्नतीसाठी आमच्याकडून धर्माचरण करून घ्या हीच प्रार्थना आहे.'

संकलन– दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था

लक्ष्मीपूजन करण्याची पद्धत आणि महत्त्व

आश्विन अमावास्येच्या, म्हणजेच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व मंदिरांत, दुकानांत, तसेच घराघरांत श्री लक्ष्मीपूजन केले जाते. आश्विन अमावास्येचा हा दिवस दीपावलीचा एक महत्त्वपूर्ण दिवस मानला जातो. सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; परंतु दीपावलीतील ही अमावस्या शरद पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेप्रमाणेच कल्याणकारी आणि समृद्धिदर्शक आहे. या दिवशी श्री लक्ष्मीपूजनासोबत अलक्ष्मी निःसारणही केले जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करावयाच्या कृतीमागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.



१. इतिहास

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे.

२. सण साजरा करण्याची पद्धत

प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.

लक्ष्मीपूजन करतांना एका चौरंगावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. काही ठिकाणी कलशावर ताम्हण ठेवून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. लक्ष्मीजवळच कलशावर कुबेराची प्रतिमा ठेवतात. त्यानंतर लक्ष्मी आदी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. मग हातातील चुडीने पितृमार्गदर्शन करतात. ब्राह्मणांना आणि अन्य क्षुधापीडितांना भोजन घालतात. रात्री जागरण करतात.

लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले नाही, तर जेवढे उपलब्ध आहे, त्या साहित्यात भावपूर्णरित्या पूजाविधी करावा. बत्तासे आदी साहित्य न मिळाल्यास, देवाला घरातील तूपसाखर, गूळसाखर किंवा रुखादा गोड पदार्थ यांचा नैवेद्य दाखवावा.

लक्ष्मी कुणाकडे वास करते ?

आश्विन अमावास्येच्या रात्री जागरण करतात. पुराणांत असे सांगितले आहे की, आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि पूजाविधी निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जिथे स्वच्छता, शोभा आणि रसिकता आढळते, तिथे तर ती आकर्षित होतेच; शिवाय ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त, तसेच क्षमाशील पुरुष आणि गुणवती अन् पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

३. लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे महत्त्व

सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; पण त्याला अपवाद या अमावास्येचा आहे. हा दिवस शुभ मानला आहे; पण तो सर्व कामांना नाही; म्हणून या दिवसाला शुभ म्हणण्यापेक्षा आनंदी दिवस म्हणणे योग्य !

४. श्री लक्ष्मीदेवीला करावयाची प्रार्थना

जमा–खर्चाच्या हिशोबाची वही लक्ष्मी ।समोर ठेवायची आणि प्रार्थना करायची, 'हे लक्ष्मी, तुझ्या आशीर्वादाने मिळालेल्या धनाचा उपयोग आम्ही सत्कार्यासाठी आणि ईश्वरी कार्य म्हणून केला आहे. त्याचा ताळमेळ करून तुझ्यासमोर ठेवला आहे. त्याला तुझी संमती असू दे. तुझ्यापासून मी काही लपवून ठेवू शकत नाही. जर मी तुझा विनयोग योग्य प्रकारे केला नाही, तर तू माझ्या जवळून निघून जाशील, याची मी सतत जाणीव ठेवतो. तेव्हा हे लक्ष्मीदेवी, माझ्या खर्चाला संमती देण्यासाठी भगवंताजवळ तू माझी शिफारस कर; कारण तुझ्या शिफारशीशिवाय तो त्याला मान्यता देणार नाही. पुढील वर्षीही आमचे कार्य सुरळीत पार पडू दे.'

५. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री कर का काढतात ?

अलक्ष्मी निःसारण

महत्त्व : गुण निर्माण केले तरी दोष नाहीसे झाले, तरच गुणांना महत्त्व येते. येथे लक्ष्मीप्राप्तीचा उपाय झाला, तसेच अलक्ष्मीचा नाशही झाला पाहिजे; म्हणून या दिवशी नवीन केरसुणी विकत घेतात. तिला 'लक्ष्मी' म्हणतात.

कृती : 'मध्यरात्री नवीन केरसुणीने घरातील कर सुपात भरून तो बाहेर टाकावा', असे सांगितले आहे. याला 'अलक्ष्मी (कचरा, दारिद्र्य) निःसारण' म्हणतात. एरव्ही कधीही रात्री घर झाडणे वा केर टाकणे करायचे नसते. फक्त या रात्री ते करायचे असते. कचरा काढतांनां सुपे आणि दिमडी वाजवूनही अलक्ष्मीला हाकलून लावतात.

६. लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक का काढावे?

आश्विन अमावास्येच्या दिवशी केल्या जाणाऱ्या श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. सर्व देवतांची पूजा करतांना त्यांना अक्षतांचे आसन दिले जाते. अन्य देवतांच्या तुलनेत श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व अक्षतांमध्ये ५ टक्के जास्त प्रमाणात आकृष्ट होते; कारण अक्षतांत श्री लक्ष्मीच्या प्रत्यक्ष सगुण गुणात्मक, म्हणजेच संपन्नतेच्या लहरी आकृष्ट करण्याची क्षमता असते. अक्षतांमध्ये तारक आणि मारक लहरी ग्रहण करून त्यांचे संचारण करण्याची क्षमता असल्याने लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढावे. स्वस्तिकामध्ये निर्गुण तत्त्व जागृत करण्याची क्षमता असल्याने श्री लक्ष्मीच्या आसनाच्या स्वरूपात स्वस्तिक काढावे.

७. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणण्याचे कारण

एखाद्या देवतेची उपासना केली की, या देवतेचे तत्त्व उपासकाकडे येते आणि त्यानुसार लक्षणे दिसतात, उदा. श्री लक्ष्मीची उपासना केली की, धनप्राप्ती होते. उपासना कमी झाली, अहं जागृत झाला की, देवतेचे तत्त्व उपासकाला सोडून जाते. अशाच कारणांमुळे श्री लक्ष्मी उपासकाला सोडून जाते. तेव्हा स्वतःची चूक मान्य न करता व्यक्ती म्हणते, लक्ष्मी चंचल आहे. येथे लक्षात घेण्यासारखे सूत्र हे की, लक्ष्मी चंचल असली, तर तिने श्रीविष्णूचे चरण केव्हाच सोडून दिले असते. – परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

संकलन– दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था

बलीप्रतिपदा (दिवाळी पाडवा)

अत्यंत दानशूर, परंतु दान कोणाला द्यावे याची जाण नसलेल्या बलीराजाला भगवान श्रीविष्णूने वामनावतार घेऊन पाताळात धाडल्याचा हा दिवस. त्रिपाद भूमी दान मागून वामनाने बलीराजाला जरी पाताळात धाडले असले, तरी सर्वार्थाने त्याचे कल्याणच केले आहे. पृथ्वीतलावर दीपावली साजरी केली जाण्यामागेदेखील या घटनेचा प्रमुख आधार आहे. बलिप्रतिपदा सणाविषयीचे शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून जाणून घेऊया.





१. तिथी : कार्तिक शुद्ध प्रतिपदा (दिवाळी पाडवा). श्रीविष्णूने ही तिथी बलीराजाच्या नावाने केली, म्हणून या तिथीला 'बलीप्रतिपदा' म्हटले जाते.

२. इतिहास : बलीराजा हा अत्यंत दानशूर होता. दारी येणारा अतिथी जे मागेल ते दान तो त्याला देत असे. 'दान देणे' हा गुण आहे; पण गुणांचा अतिरेक हा दोषार्ह असतो. कोणाला काय, केव्हा आणि कोठे द्यावे याचा निश्चित विचार आहे अन् तो शास्त्रात आणि गीतेत सांगितला आहे. सत्पात्री दान द्यावे. अपात्री देऊ नये. अपात्र माणसांच्या हाती संपत्ती गेल्याने ते मदोन्मत्त होऊन वाटेल तसे वागू लागतात. बलीराजा कोणालाही केव्हाही जे मागेल ते देत असे. तेव्हा भगवान श्री विष्णूने मुंजा मुलाचा अवतार (वामनावतार) घेतला. (मुंजा मुलगा लहान असतो अन् तो 'ॐ भवति भिक्षां देही ।' म्हणजे 'भिक्षा द्या' असे म्हणतो.) वामनाने बलीराजाकडे जाऊन भिक्षा मागितल्यावर त्याने विचारले, ''काय हवे ?'' तेव्हा वामनाने त्रिपाद भूमीदान मागितले. 'वामन कोण आहे आणि या दानामुळे काय होणार', याचे ज्ञान नसल्याने बलीराजाने त्रिपाद भूमी वामनाला दान दिली. त्यावरोबर वामनाने विराटरूप धारण करून एका पायाने सर्व पृथ्वी व्यापून टाकली. दुसर्या पायाने अंतरिक्ष व्यापले अन् त्याने ''तिसरा पाय कोठे ठेवू ?'', असे बलीराजास विचारले. त्यावर बलीराजा म्हणाला, ''तिसरा पाय माझ्या मस्तकावर ठेवा.'' तेव्हा 'तिसरा पाय त्याच्या मस्तकावर ठेवून बलीराजाला पाताळात घालावयाचे' असे ठरवून वामनाने, ''तुला काही वर मागावयाचा असेल तर माग (वर ब्रूहि)'', असे त्याला सांगितले. तेव्हा त्याने वर मागितला, 'आता पृथ्वीवरील माझे सर्व राज्य संपणार आहे आणि आणण मला पाताळात घालविणार आहात, तेव्हा तीन पावले तरी वामनाने जे सर्व घडले, ते पृथ्वीवर प्रतिवर्षी तीन दिवस तरी माझे राज्य म्हणून ओळखले जावे. प्रभू, यमप्रीत्यर्थ दीपदान करणार्याला यमयातना होऊ नयेत, त्याला अपमृत्यू येऊ नये आणि त्याच्या घरी लक्ष्मीने निरंतर वास करावा.' ते तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा. याला 'बलीराज्य' असे म्हणतात.

३. महत्त्व : दिवाळी पाडवा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे. हा 'विक्रम संवत' कालगणनेचा वर्षारंभदिन म्हणून साजरा करतात.

४. सण साजरा करण्याची पद्धत

या दिवशी बलीराजाच्या प्रतिमेचे पूजन करून त्याला नैवेद्य दाखवला जातो; म्हणजेच त्याच्या क्षुधा–तृष्णा शांत केल्या जातात. बलीप्रतिपदेच्या दिवशी जमिनीवर पंचरंगी रांगोळीने बली आणि त्याची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. यानंतर बलीप्रीत्यर्थ दीप अन् वस्त्रे यांचे दान करतात. या दिवशी प्रातःकाळी अभ्यंगस्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. दुपारी ब्राह्मणभोजन घालतात. या दिवशी पक्वान्नांचे भोजन करतात.

पाडव्याला पतीला ओवाळण्यामागील आध्यात्मिक महत्त्व काय ? – या दिवशी प्रातःकाळी अभ्यंगस्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. पुरुष हे शिवाचे आणि स्त्री हे दुर्गादेवीचे प्रतीक आहे. ओवाळल्यामुळे पलीमध्ये दुर्गात्तत्व कार्यान्वित होते आणि पतीचे औक्षण केल्यानंतर त्याची कुंडलिनीशक्ती जागृत होऊन त्याच्यातील सुप्तावस्थेत असणारे शिवतत्त्व प्रकट होते.

बलीराज्यात शास्त्राने सांगितलेली निश्चिद्र कर्मे सोडून आपल्या मनाला वाटेल तसे लोकांनी वागावे', असे धर्मशास्त्र सांगते. अभक्ष्यभक्षण, अपेयपान आणि अगम्यगमन ही निश्चिद्र कर्मे आहेत; म्हणून या दिवसांत माणसे दारू उडविताना (आतषबाजी करतात); पण दारू पीत नाहीत ! शास्त्राने परवानगी दिली असल्याने परंपरेने लोक या दिवसांत मौजमजा करतात.

या दिवशी लोक नवीन वस्त्रांवरुन घेतलेल्या सर्व दिवस आनंदात घालवितात. या दिवशी गोवर्धनपूजा करण्याची प्रथा आहे. त्यासाठी शेणाचा पर्वत करून त्यावर दूर्वा आणि फुले खोचतात. श्रीकृष्ण, इंद्र, गायी अन् वासरे यांची चित्रे शेजारी मांडून त्यांचीही पूजा करतात आणि गिरवणूक काढतात.

५. ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा करत देववाला पोहोचलेल्या बलीची आठवण करावी ! : 'बलीप्रतिपदेला बळीची पूजा करतात. बळीने राक्षस कुळात जन्म घेऊनही त्याच्या पुण्याईने त्याच्यावर वामनदेवाची कृपा झाली. त्याने ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा केली. तो सात्त्विक वृत्तीचा आणि दानी राजा होता. प्रत्येक मानव हा सुरुवातीला अज्ञानी असल्यामुळे त्याच्या हातून वाईट कृत्य घडत असते; परंतु ज्ञान आणि ईश्वरी कृपा यांमुळे तो देवत्वाला पोहोचू शकतो, हे या उदाहरणावरुन दिसून येते. अशा निर्भयतेने सत्यकर्माचे पालन केल्यावर त्याला मृत्यूमयच रहात नाही. यमसुद्धा त्याचा मित्र व बंधू होतो. या दिवशी भगवंताने वामन अवतारात दाखवून दिले की, भगवंत हा सर्वस्व अर्पण करणार्याचा दाससुद्धा होण्याची तयारी ठेवतो. बली वास्तविक असुर घराण्यातील असूनसुद्धा त्याच्या दारात उपासना करून त्याचा तत्त्वामुळे अन् त्याने भगवंताला शरण जाऊन आपले सर्वस्व अर्पण केल्यामुळे भगवंताने त्याला योग्य मार्गदर्शन करून त्याच्या जीवनाला कलाटणी दिली आणि त्याचा उद्धार केला. त्याच्या राज्यात असलेले असुरवृत्तीला पोषण असे भोगमय विचार घालवून, त्या ठिकाणी त्यागाची भावना रुजवून, जनतेला दैवीविचार देऊन सुख आणि समृद्धी यांचे जीवन प्रदान केले.' – परात्परु गुरु परशराम माधव पांडे महाराज

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

संकलन –दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था

भाऊबीज (यमद्वितीया)

या दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहिणीकडे जेवायला जात असल्याने नरकातील जिवांना या दिवशी नरकयातना भोगाव्या लागत नाही, असे म्हटले जाते. तसेच या दिवशी बहीण भावाला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. पुराणकाळापासून चालत आलेल्या या सणाबद्दलची शास्त्रीय माहिती या लेखाच्या माध्यातून करून घेऊया.

१. तिथी : कार्तिक शुद्ध द्वितीया

२. इतिहास : या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला; म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे नाव मिळाले.

३. महत्त्व :

अपमृत्यू ऐऊ नये म्हणून धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी आणि यमद्वितीया या दिवशी मृत्यूची देवता 'यमधर्म' हिचे पूजन करतात.

'या दिवशी यमराज आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला जातो अन् त्या दिवशी नरकात पिचत पडलेल्या जिवांना त्या दिवसापुरते मोकळे करतो.' हा दिवस मातेच्या गर्भातून जन्म घेतलेल्या जिवांना एकमेकांविषयी वाटणारा जिव्हाळा व्यक्त करण्याचा दिवस आहे.

या दिवशी जी बहीण आपल्या भावासाठी श्री यमाईदेवीकडे काही मागणे मागते, तिच्या भावानुसार ते भावाला मिळते. त्यामुळे तिचे भावाशी असलेले देवाण–घेवाण हिशोब काही प्रमाणात संपुष्टात येतात.

४. सण साजरा करण्याची पद्धत

यमतर्पण, यमदीपदान आणि यमाची प्रार्थना करणे – अपमृत्यू निवारणार्थ 'श्री यमधर्मप्रीत्यर्थ यमतर्पणं करिष्ये ।' असा संकल्प करून यमाच्या चौंदा नावांनी तर्पण करावे. हा विधी पंचांगात दिलेला असतो. 'याच दिवशी यमाला दीपदान करायचे असते. यम ही मृत्यू आणि धर्म यांची देवता आहे. 'प्रत्येक माणसाला मरण आहे', ही जाणीव सतत असणे आवश्यक आहे; कारण त्यामुळे माणसाच्या हातून वाईट कार्य वा धनाचा अपव्यय होणार नाही. तेव्हा यमाला दीपदान करुन सांगायचे, 'हे यमा, या दीपप्रभाणे आम्ही सतर्क आहोत, जागरुक आहोत. जागरुकतेचे, प्रकाशाचे प्रतीक असलेला दीप तुला अर्पण करीत आहोत, त्याचा स्वीकार कर. तुझे आगमन केव्हा होईल, हे आम्हाला माहीत नाही; म्हणून आम्ही आमचा हिशोब वेळच्या वेळी ठेवतो, ज्यामुळे अर्धवट राहिलेल्याची चिंता करण्याची वेळ येत नाही; कारण आम्हाला माहीत आहे की, तू अचानक कधीही येऊ शकतोस.' – परात्परु गुरु परशराम माधव पांडे महाराज

बहिणीने भावाला ओवाळणे – या दिवशी भावाने बहिणीकडे जावे आणि बहिणीने भावाला ओवाळावे. ऐद्याच स्त्रीला भाऊ नसेल, तर तिने कोणाही परपुरुषाला भाऊ मानून त्याला ओवाळावे. ते शक्य नसल्यास चंद्राला भाऊ मानून ओवाळावे. ऋया दिवशी कोणत्याही पुरुषाने स्वतःच्या घरी पत्नीच्या हातचे अन्न घ्यायचे नसते. त्याने बहिणीच्या घरी जावे अन् लिला वस्त्रालंकार वगैरे देऊन तिच्या घरी भोजन करावे. सख्खी बहीण नसेल, तर कोणत्याही बहिणीकडे किंवा अन्य कोणत्याही स्त्रीला भगिनी मानून तिच्याकडे जेवावे.'

५. भाऊबीजेला भगिनींना स्वसंरक्षणार्थ समर्थ करुया !

'क्लिष्टेक भगिनींवर आज बलात्कार होतो, क्लिष्टेकींचे संसार उद्ध्वस्त होतात. एकतर्फी प्रेमातून क्लिष्टेकींची उघड उघड हत्याही होते. समाजाच्या प्रेवत्त, म्हणजे क्षात्रधर्महीन मानसिकतेचे हे प्रतीक आहे. स्वतःच्याये क्षात्रतेज जागवून शारीरिक अन् मानसिक दृष्ट्या सबळ होऊन आपल्या भगिनींचे रक्षण केले पाहिजे. याचबरोबर भगिनींनाही स्वसंरक्षणार्थ सिद्ध होण्यासाठी प्रोत्साहित आणि प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. हीच त्यांच्यासाठी भाऊबीजेची खरी भेट ठरेल. दीपावलीच्या निमित्ताने समाज, राष्ट्र अन् धर्म यांसाठी काहीतरी करण्यासाठी यथाशक्ती पाऊल उचलले, तरच हा सण खर्या अर्थाने साजरा होईल.'

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

संकलन– दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था

गृहिणी

आरोग्य

डोळ्यांद्वारे पार्किन्सन्सचं निदान

भविष्यात पार्किन्सन्स विकाराचं निदान डोळ्यांच्या तपासणीने करता येणार आहे. रेटिनाचा संबंध पार्किन्सन्स आजाराशी जोडला जात आहे. रेटिना आक्रसू लागल्यास रूग्णाला पार्किन्सन्सचा धोका असू शकतो.

डोपामाईनची निर्मिती करणाऱ्या मेंदूतल्या पेशींची संख्या कमी झाली की रेटिना आक्रसू लागते. डोपामाईनमुळे शरीरातल्या हालचालींवर नियंत्रण राहतं. रेटिना जेवढा जास्त आक्रसतो तेवढा पार्किन्सन्सचा धोका अधिक असतो. यामुळे पुढच्या काळात डोळ्यांच्या साध्याशा तपासणीने पार्किन्सन्सचं निदान पहिल्या टप्प्यात करणं शक्य होणार आहे.

दिवाळी स्पेशल पाककला

खजूर लाडू

साहित्य : बिया काढलेला १ वाटी खजूर, अर्धी वाटी दाण्याचे कूट, ५-६ बदाम, ५-६ काजू, वेलची पूड, १ चमचा भाजलेले तीळ, १ चमचा भाजलेली खसखस, पाव वाटी पिठी साखर, ३-४ चमचे खरवडलेले सुके खोबरे

कृती : वर दिलेले सर्व पदार्थ एकत्र करून मिक्सरमधून वाटून घ्या. खजुरामुळे हे सर्व मऊ होते जास्त बारीक वाटून नये. हे सर्व मिश्रण लाडू स्वरूपात वळावे. प्रत्येक लाडूवर बदाम आणि काजू लावावा आणि मग खोबऱ्यात घोळवावा.

वास्तू

दुहेरी दरवाजा

बदलत्या काळानुसार अनेक गोष्टी बदलल्या आहेत. जसे की घराचा दरवाजा, आजकाल आधुनिक दरवाजे बसवण्याचा ट्रेंड आहे. लोक त्यांच्या घराचे सौंदर्य वाढवण्यासाठी स्टायलिश दरवाजे बसवतात. पण तुम्हाला माहित आहे का की प्रत्येक सुंदर दिसणाऱ्या दरवाजाचा तुमच्या आयुष्यावर चांगला प्रभाव पडतोच असे नाही. आजकाल घरांमध्ये एकच दरवाजे बसवले जातात. परंतु जुन्या काळात घरांमध्ये दुहेरी दरवाजे बसवले जात होते. दोन पानांचे दरवाजे शुभ मानले जातात. कारण वास्तूनुसार घर सदस्यांमध्ये चांगले संबंध राखणे आवश्यक आहे.

सल्ला

फाटलेल्या ओठांच्या भेगा बऱ्या करण्यासाठी तुम्ही त्यावर दररोज व्हॅसलीन वापरू शकता. जेणेकरून ते अगदी गुळगुळीत आणि शार्प दिसू शकतील.

सौंदर्य

ओठांवर डेड स्किन सेल्स जमा झाल्यामुळे ओठ काळे दिसतात. या काळ्या ओठांना गुलाबी करण्यासाठी ओठांना स्क्रबने रब करत धुवा. हे जसे तुम्ही चेहरा स्क्रब करता तसे करावे लागेल. ओठांवरून डेड सेल्स काढून टाकल्याबरोबर ओठांचा नैसर्गिक रंग सुधारतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १ नोव्हेंबर २०२४

लक्ष्मी कुबेर पूजन, अभ्यंगस्नान, महावीर निर्वाण दिन, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, स्वाती २७।३१, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य

मेष : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

वृषभ : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

मिथुन : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. चुकीचा प्रभाव पडू शकतो.

कर्क : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

सिंह : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा.

कन्या : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या. घरातील वातावरण आनंददायी राहील.

तूळ : योजनांमध्ये केलेल्या बदल इतर काने करण्यासाठी प्रवृत्त करेल.

वृश्चिक : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होण्याचा योग आहे.

धनु : उधारी उसनवारी वसुल होईल. बाहेरचे अन्न सेवन केल्यामुळे त्रास होईल.

मकर : मागील काही दिवसांपासून जे आपण नियोजन केलेले आहे ते आज फळास येईल. उपकरणे बिघडतील.

कुंभ : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील. कुटुंबियांचा सहवास लाभेल.

मीन : आर्थिक विषयांमध्ये नुकसन होईल. पितृचिंता सतावेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

हसा आणि शतायुषी व्हा!

बायको – नेहमी माझं अर्ध डोक दुखत राहते. वाटतंय डॉक्टरला दाखवायला हवं
नवरा – अरे त्यात काय दाखवायचं! जितकं आहे तितकंच दुखणार ना!

...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

- वस्तु व सेवा कराशी संबंधीत घटना दुरुस्ती कितवी आहे? – १०१ वी
- ध्वनीचा वेग कशामध्ये सर्वात जास्त असतो? – स्थायू
- पूर्ण वाढ झालेल्या मनुष्यामध्ये किती हाडे असतात? – २०६
- राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान ही संस्था कोठे ओह? – नागपूर

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

फिल्मीचक्कर क्र. ११६१ सौ. शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) +++ कुलकर्णी (अभिनेत्री) 'चंदा को ढूंढने सभी ८) ++ जमाना (चित्रपटाचे तारे निकल पडे' हे गाणे नाव) ९) आमीरखान, ग्रेसी असलेला जुन्या काळातील सिंग यांचा एक गाजलेला एक चित्रपट ४) ++ गये चित्रपट १०) ये ++ मस्तानी उस्ताद (चित्रपटाचे नाव) ६) मदहोश किये जा (गाणे) ११) दिलीपकुमार, वैजयंतीमाला यांचा एक गाजलेला चित्रपट १४) महलोंका राजा ++ + + + ++ राज करेगी (गाणे) १६) + और मेरा हाथी (चित्रपटाचे नाव)

उभे शब्द :- १) धर्मेंद्र, राखी यांचा एक चित्रपट २) दादा कोंडके, उषा चव्हाण; अशोक सराफ, रत्नमाला यांचा एक गाजलेला मराठी चित्रपट ३) ++ आप के है कौन (चित्रपटाचे नाव) ५) बावरे +++ (चित्रपटाचे नाव) ७) ऐश्वर्या रॉय, अक्षय खन्ना यांचा एक चित्रपट १२) मेरा ++ जोकर (चित्रपटाचे नाव) १३) ++ मजनू (चित्रपटाचे नाव) १४) अमिताभ बच्चन, जया भादुरी यांचा एक चित्रपट १५) यात माधुरी दीक्षित नायिका आहे

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : प्रेम सर्वांवर करा पण श्रध्दा फक्त परमेश्वरावरच ठेवा.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

इलेक्ट्रिक बल्बचा शोध कोणी लावला?

पहिल्या इलेक्ट्रिक बल्बचा जन्म थोडा वादग्रस्त आहे. तसं तर थॉमस अल्वा एडिसन यांना बल्बचं जनक मानलं जातं, पण त्यांनी शोध लावला साधारण त्याच दरम्यान अनेकांनी पहिला बल्ब पेटवल्याचा दावा केला आहे. या वादाला कारण आहे.

काचेच्या एका निर्वात भांड्यात एका पातळ तारेतून करंट सोडला की त्याचं तापमान वाढून त्यातून प्रकाशाच्या रूपात ऊर्जा उत्सर्जित होते, हा मूळ सिद्धांत आहे, जो २०० वर्षांपूर्वीच हम्फ्री डॅव्ही नावाच्या एका रसायनशास्त्रज्ञानं मांडला होता.

पण अनेकांनी वेगवेगळ्या धातूंच्या तारा आणि हवेचा दाब बदलत नेमका सर्वाधिक प्रकाश कधी मिळतो याचा अभ्यास केला. गंमत अशी की जगाच्या वेगवेगळ्या कोपऱ्यांत बसून अनेक जण हे प्रयोग करत होते. त्यामुळे पहिला बल्ब कोणी पेटवला, याबाबत अचूक माहिती मिळणं तसं अवघडच आहे. असो, पण बल्बमुळे जगात उजेड पसरला. रात्रीच्या वेळी दिवे-मशालींवर जगणारी दुनिया बल्बच्या उजेडात जग पाहू लागली. 'स्वदेस' सिनेमातला झोपडीत बल्ब लागल्यानंतर आज्जीच्या चेहऱ्यावरचा आनंद टिपणारा प्रसंग तुम्हाला लक्षात असेलंच?

अर्थात या बल्बमुळे औद्योगिकीकरणाला बळ मिळालं असलं तरी माणसासाठी एक वाईट गोष्ट घडली नाईट शिफ्ट! रात्रपाळीच्या नोकऱ्या सुरू झाल्या आणि अनेक लोक वैतागले. साहजिक आहे ना, उत्पादन वाढलं असलं तरी लोकांच्या झोपेची मात्र बोंब झाली.

एका लहान मुलाला त्याच्या आईचा राग आला आणि तो आय हेट यू असे ओरडू लागले. त्यानंतर फटकारण्याच्या भीतीने तो घरातून पळून गेला.

तो टेकड्यांवर गेला आणि ओरडू लागला, 'आय हेट यू, आय हेट यू' आणि तोच आवाज प्रतिध्वनीत झाला, 'आय हेट यू, आय हेट यू' आयुष्यात पहिल्यांदाच त्याला प्रतिध्वनी ऐकू आल्या.

तो घाबरून त्याच्या आईकडे धावत गेला

प्रतिध्वनी

आणि म्हणाला, 'खोऱ्यात एक वाईट मूल आहे जो रडतो, मी तुझा तिरस्कार करतो, मी तुझा तिरस्कार करतो.'

त्याच्या आईला सगळा प्रकार समजला आणि तिने आपल्या मुलाला टेकडीवर जाण्यास सांगितले आणि पुन्हा ओरडले,

'मी तुझ्यावर प्रेम करतो, मी तुझ्यावर प्रेम करतो.'

लहान मूल तिथे गेले आणि ओरडले,

'मी तुझ्यावर प्रेम करतो, मी तुझ्यावर प्रेम करतो.'

आणि तोच आवाज घुमला. आणि अशा प्रकारे मुलाला या घटनेतून एक धडा मिळाला आपले जीवन प्रतिध्वनीसारखे आहे. आपण जे देतो ते परत मिळते.

तात्पर्य – आम्ही ज्यांचा तिरस्कार करतो त्यांना दुसऱ्यांच्या दृष्टीने पाहावं लागतं, पण आम्ही ज्यांना प्रेम करतो त्यांना देव दृष्टीने पाहावं लागतं.

जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

तीसरी श्रेणी में वे लोग आते हैं जो गुरु के निर्देशों पर अमल करते हैं चाहे वे रूहानियत के मार्ग पर काफी आगे बढ़ चुके होते हैं परन्तु अभी पूर्णता को प्राप्त नहीं हुए होते। ऐसी आत्माओं को अपने अन्त समय और दिन के बारे में काफी पहले पता लग जाता है। मौत की प्रक्रिया से पूरी तरह अभ्यस्त होने के कारण वे इससे डरते नहीं। इसके विपरीत संसार में आते समय जैसे उन्होंने यह शरीर रूपी वस्त्र पहना था, उसी तरह अपनी इच्छा और उत्सुकता से इस फटे पुराने और जर्जर

बन्धनों में मृत्यु – हुए वस्त्र को उतार फेंकने के लिए निश्चित समय की प्रतीक्षा करते हैं। वे आत्मिक संसार के कुछ मण्डलों को और जिस विशेष मण्डल पर उन्हें जाना होता है भली-भाँति जानते हैं। यहाँ वे कुछ समय ठहरते हैं और वहाँ से आगे ऊपर के मण्डलों की ओर बढ़ते रहते हैं। वे सारा समय

जीवन की रोशनी

चेतन रूप होकर गुरु की याद में रहते हैं और उसके सिवाय किसी और की भक्ति नहीं करते।

वे आत्मा के पीछे चलते हैं और कर्म बन्धन से स्वतंत्र होते हैं। (बाईबल)

सबसे अंत में पूर्ण रूप हो चुकी आत्माएँ आती हैं। ये जीवन मुक्त होती हैं और स्वतंत्र रूहानी जीवन व्यतीत करती हैं। वे बहुत समय पहले से ही जानती होती हैं कि उन्हें कब प्रभु के धाम जाना है। वे बड़ी खुशी- खुशी उस समय की प्रतीक्षा करती हैं और जिस ढंग से शरीर छोड़ना पड़े, चाहे सलीब पर लटककर, चाहे फाँसी द्वारा, चाहे गर्म तवों पर वे इसका बैठकर और चाहे जल्लाद की तलवार से सिर कटवा कर, स्वागत करते हैं। उनकी अपनी कोई इच्छा या संकल्प नहीं होता। वे साथ मिलाप का के के अन्दर रहते हैं और मौत को प्रभु हुक्म साधन समझते हुए उसे खुशी-खुशी गले से लगा लेते हैं। वे इस बात की चिन्ता नहीं करते कि मौत कैसे आती है। मौत एक दम आये या अन्धविश्वासी क्रूर धर्म अधिकारियों शासकों के हुक्म से धीरे-धीरे दी जाने वाली यातनाओं से आए, यह उनके लिए सबसे अधिक खुशी का समय होता है। उन्हें इस बात की चिन्ता नहीं होती कि उनकी जीते जी खाल (चमड़ी) उतारी जाती है, शरीर के टुकड़े कर दिये जाते हैं, जीवित जला दिया जाता है, विष का प्याला पीने को दिया जाता है या अपराधियों के बीच सूली पर चढ़ा दिया जाता है। वे मौत से चाहे यह किसी भी हो, खुला हाथ मिलाते हैं। इस तरह यह गुरुमुखों, सन्तों और मार्ग है। श्री गुरु अमरदास जी के बारे में कहा जाता कि जब उनका अन्त समय आया तो संगत को बुलाया और फरमायाः–

मत मैं पिछे कोई रोवसी सो मैं मूलि न भाइया ।। अन्ते सतगुरु बोलिया मैं पिछे कीरतनु करिअहि निरबाण जीउ ।। हरि भाया सतगुरु बोलिया हरि मिलिया पुरखु सुजाणु जीउ ।। (रामकली)

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

अंतरिक बल (भाग – २)

निवेश करेगें तो ८०/२० का नियम काम करने लगता है तभी हम आर्थिक स्वतंत्रता प्राप्त कर सकते हैं। ऐसा करने से बहुत सारा समय बच जाएगा जो आप धन कमाने में सारी उम्र में खर्च करते हैं। धनवान बनने के लिये सरकार अनेको स्कीमें चलाती है। हमें उनका लाभ लेना चाहिए।

व्यर्थ और समय प्रबन्धन – निरर्थक वार्तालाप या बे मतलब की बातें हमारा समय जाया करती हैं। व्यर्थ वार्तालाप से बिगाड़ने वाले कारक, ईगो, अहम, लड़ाई झगड़े, लगाई बुझाई आदि पैदा हो जाते हैं। ईर्ष्यालु व्यक्ति दूसरे से जलने कुढ़ने उसकी बुराई करने तथा इमेज खराब करने जैसे कामों में बहुत समय खराब कर देते हैं। अच्छा व्यक्ति उतने ही समय का उपयोग दूसरों के गुण देखने में लगाता है और आगे बढ़ जाता है। हम अपना समय इस गलत फहमी में बिताते हैं कि जैसे हमारे ही सिर पर आकाश टिका हो। हम नहीं होंगे तो ये कैसे होगा? वो कैसे होगा ? बस इस गलतफहमी में हम अपना भी समय खोते रहते हैं और दूसरों को भी पंगु बनाते रहते हैं। प्रत्येक व्यक्ति हर बात को अपने अनुरूप ढाल सकता है। जो हम कर रहे हैं, वही ठीक है। यह पराधीन बनानें वाली राह है। बहुत से लोग तो इस बात को ही भूल चुके होते हैं कि जिस काम को हम

अंतरीक बल

कर रहे हैं, इसे किसी और तरीके से और भी बेहतर किया जा सकता है। बहुत से पशु एक निश्चित जगह ही भोजन खोजते हैं। उन्हें अक्सर भूखे ही रहना पड़ता है। कुछ पशु खाने पीने की नई नई जगह खोजते रहते हैं वे खुश मिजाज रहते हैं। इसी तरह हम आदतों, अभ्यासों और पूर्वाग्रहों से घिरे रहते हैं। परिस्थितियों को अनुकूल बनाने के बजाय खुद आई हुई परिस्थितयो के अनुकूल हो जाते हैं। जिस से हम मन चाहे लक्ष्य नहीं पा सकते। कुछ लोगों की आदत होती हैं कि वह काम को टालते रहते हैं। उन्हे कुछ भी करने को कहो वह कहेगें कल करेगें, परसो करेगें। उन कामो को न करने की कसक रहती हैं। यही कसक हमारी ऊर्जा को नष्ट करती है। काम कर के व्यक्ति उतना नहीं थकता जितना उसके बारे में सोच सोच कर थकता है। टाइम मैनेजमेंट कर के ऐसे लंबित कार्यो को पूरा कर के अपना बोझ घटा सकते हैं। आज हर कोई समय नहीं है का राग अलापता है। समय की कमी इसलिए है क्योंकि हम बहुत से काम ऐसे करते हैं जिन से हमारा कोई लेना देना नहीं है। राजनीति पर अनावश्यक बहस । फोन पर बेकार की गपछप और बताओ और बताओ करते लोग, खाना खाया क्या, अच्छा आज क्या बनाया था, ऐसा करते हुए १०-१५ मिनिट ऐसे ही बिता देते हैं। कुछ लोग चीजे घर में इधर उधर रख देते हैं फिर घंटो उन्हें ढूंढने में लगा देते हैं। जब समय प्रबन्धन हमारे अधीन न हो

समय वह अदृश्य शक्ति है जिस में उत्थान और पतन छिपा हुआ है। समय प्रबन्धन प्रत्येक व्यक्ति के लिये जरूरी है। समाज में जो असमानता हम देखते हैं, उसकी जड़ में समय प्रबन्धन की कमी है। हम सभी व्यक्ति जन्म से लेकर पूरा जीवन दूसरों के साथ रहते हैं और हालात ऐसे हो जते हैं कि हमें उनके हिसाब से काम करना पड़ता है, जिस के कारण हम मनचाहे लक्ष्य प्राप्त नहीं कर पाते। बबे किसी के अधीन नहीं होते जिस से समय प्रबंधन नहीं हो पाता। बबा कहानी सुनना चाहता है। आप चाहते हैं कि उसे विज्ञान पढ़ा दी जाए। ना वह मानता है और ना आप । परिणाम यह कि न कहानी सुनाई जा सकी और न ही विज्ञान पढा सके तथा सिर दर्द और हुआ। समय नष्ट हुआ। बोस चाहता है कि आप पेन्डिंग काम पूरा करें तब नया काम शुरू करें। आप को लगता है पेन्डिंग काम तो थोड़ा सा है इतना

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

याचे दुष्परिणाम सर्व शरीरावर दिसतात. रुग्ण एकामागे एक वेगवेगळ्या रोगांना बळी पडतो. अशतपणा, भूक मंदावणे, अंगामध्ये बारीक ताप, नागीण, क्षयरोग असे विविध आजार रुग्णाला होतात. त्याच बरोबर योनीमध्ये सफेद स्रावाचे प्रमाण वाढते. योनीला वारंवार जंतुसंसर्ग होतो. HIV चे विषाणू शरीरामध्ये निर्माण होणाऱ्या प्रत्येक स्रावामध्ये असतात. परंतु रक्त, वीर्य व योनीतील स्राव यामध्ये जास्त प्रमाणात आढळतात. कधी कधी हा स्राव पूमिश्रित असतो. रक्तातून एलायझा तपासणी करून याचे निदान करता येते.

५) 'हिपॅटायटिस बी (ऑस्ट्रेलियन ॲन्टिजेन) : गर्भवती स्त्रीला 'हिपॅटायटिस बी' की लागण झालेली असेल, तर प्रसूती नंतर बाळाला त्याची लागण होऊ नये किंवा झाली. त त्याच्यामध्ये प्रतिकारशक्ती निर्माण होण्यासाठी बाळाला इम्युनोग्लोबीनचे इंजेक्शन लेणे आवश्यक असते; म्हणून गर्भावस्थेमध्ये हिपॅटायटिस बीची तपासणी करणे गरजचे असते. वरील सर्व रक्ततपासण्या एकदाच करून घ्याव्यात. गर्भावस्थेत फक्त गरजेनुसार हिमोग्लोबीनचे प्रमाण दोन वेळा तपासावे.

६) मूत्र तपासणी : या तपासणीतून लघवीमध्ये

गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

जंतूसंसर्ग आहे किंवा लघवीमध्ये अल्ब्युमिन, साखर आहे का याचे निदान होते. लघवीमध्ये अल्ब्युमिन, साखर आढळल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावा. व ही मुत्र तपासणी २-३ महिन्यांच्या अंतराने वेळोवेळी करावी.

७) सोनोग्राफी : २-३ महिने : या कालावधीत सोनोग्राफी केली असता बाळाची वाढ, बाळाची संख्या, बाळामधील विकृती, गर्भाशयाची प्राकृतावस्था-विकृतावस्था समजते.

५ ते ६ महिने : बाळाची वर (Placenta) कुठे आहे हे समजते. जर ती गर्भाशयाच्या तोंडाशी असेल, तर गर्भवतीला पूर्ण आराम घ्यावा लागतो. या महिन्यात सोनोग्राफीमुळे बाळामध्ये जन्मजात काही व्यंग असतील तर ते समजते व । यासाठीच या महिन्यात ॲनोमॅली स्कॅन (nomaoly Scan) सोनोग्राफी करुन घ्यावी.

६ ते ९ महिने (Polyhydraminous) : बाळाची वाढ महिन्यांप्रमाणेच आहे का ते समजते. बाळाभोवतीचे पाणी योग्य प्रमाणात आहे का ते समजते. बाळाभोवतीचे पाणी कमी व अति प्रमाणात (Polyhydraminous) असू नये, सोनोग्राफीमुळे बाळाची प्रसूतीच्या वेळेची अवस्था (Position) समजते.

८) रक्तदाब तपासणी :

गर्भवतीने डॉक्टरांकडे तपासणीसाठी पहिल्या १ ते ३ महिन्यामध्ये महिन्यातून एकदा जावे. नंतर ३ ते ७ महिन्यांमध्ये महिन्यातून दोनदा जावे व आठ महिन्यानंतर आठवड्यातून एकदा जावे, कारण ७ व्या महिन्यानंतर काही गर्भवती महिलांमध्ये रक्तदाब वाढलेला असतो व त्यामुळे तिच्या अंगावर, पायावर सूज येते. त्याच प्रमाणे तिला चक्कर येणे, डोके दुखणे ही लक्षणे जास्त आढळून येतात. रक्तदाब आठवड्यातून एकदा तपासावा, कारण रक्तदाब जास्त वाढल्यामुळे लक्ष दिले नाही, तर गर्भवतीला झटके येऊ शकतात व बाळ पोटातच गुदमरण्याची शक्यता असते; म्हणून गर्भवती व तिच्या बाळाच्या आरोग्यासाठी रक्तदाब नियमित तपासणे जरुरीचे असते.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मल-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

वास्तुशात्रातले (आर्किटेक्चर) : जुनं ते सोनं

OLD IS GOLD म्हणजेच जुनं ते सोनं ही म्हण आपण नेहमीच ऐकतो, म्हणतो किंवा अनुभवतो, पण आज आपण वास्तुशात्रामधील (आर्किटेक्चर) या बद्दल थोडक्यात समजावून घेण्याचा प्रयत्न करूया.

आज बऱ्याच क्षेत्रामध्ये जुनी फॅशन – ट्रॅड्स आता पुन्हा नव्याने येऊ लागले आहेत. आपण हे सोशल मीडियाच्या माध्यमातून बघत असतो. त्याच प्रमाणे वास्तुशात्रातही आता हे आपल्याला दिसू लागले आहे. आता वास्तुशात्र म्हंटल कि बऱ्याचदा फक्त कोणत्या दिशेला काय असायला हवं किंवा काय नको हे म्हणजेच वास्तुशात्र असा समज आहे परंतु असे मुळीच नाहीये. आज लोकांना वास्तुशात्र पेक्षा आर्किटेक्चर म्हंटल तर लक्षात येत पण त्यातही बऱ्याचशा सर्व सामान्य लोकांपर्यंत आर्किटेक्चर किंवा आर्किटेक्ट (वास्तुविशारद) ह्यांच बांधकाम क्षेत्रातल कामाच स्वरूप माहित नाही.

वास्तुविशारद (आर्किटेक्ट) : आपल घर किंवा कोणत्याही प्रकारच्या बांधकामासाठी (कमर्शिअल, रेसिडेन्शिअल, पब्लिक बिल्डींग, धार्मिक स्थळ, इंटेरिअर) प्रामुख्याने जागेच सुयोग्य नियोजन (Planning), वास्तूची आतील (Interior) व बाहेरील सुंदरता/ सुशोभीकरण, वास्तुशात्र (Vastu) तसेच आपल्या भागातील हवामान (Climate), स्थानिक मटेरियल यासारख्या अनेक गोष्टींचा आभ्यास करून आपल्याला आपली स्वप्नांतील वास्तू प्रत्यक्षात आणण्यास वास्तुविशारद (आर्किटेक्ट) त्या कामाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत मार्गदर्शन व मदत करतो.

ट्रेंड/फॅशन : आजकाल काही ठिकाणी घरामध्ये किंवा मोठ्या इमारतींमध्ये नुसत्या विटांचे किंवा दगडी बांधकाम करून सुंदर डिझाईन पॅटर्न केलेले तर काही घरांची कौलाफ छत असलेली आपण पाहतो आणि ह्या प्रकारची घरे किंवा इमारती आपल लक्ष नक्कीच वेधतात. आज बरेच मोठ्या शहरात राहणारे लोक शहरापासून जवळ पास असणाऱ्या छोट्या गावात निसर्गाच्या सानिध्यात पर्यावरणपूरक (Ecofriendly) घर/ फार्म हाऊस बांधतात उभ्याच्या कमीत कमी किंवा गरजेपुरते स्टील व सिमेंटचा वापर करून आणि प्रामुख्याने त्याच भागात मिळणार दगड, विटा, माती, चुना, लाकूडका, कौल तसेच जुने दरवाजे फर्निचर यांचा उपयोग करून आपल घर बांधतात. या मागे शहरी भागात वाढत चाललेला मानसिक तणाव व आरोग्याची हेळसांड, प्रदूषण, धावपळ तसेच अपार्टमेंट मध्ये मर्यादित जागा हि महत्वाचे कारण आहेत. त्यामुळे आता फार्म हाऊस, विकेंड होम, सेकेंड होम हे सुरु झाले.आहे. शहरातील लोकांमध्ये आरोग्याबद्दल भरपूर जागरूकता येत आहे. त्यांना आता AC ऐवजी नैसर्गिक हवा, RCC स्लॅब पेक्षा कौलारू छत, सिमेंट ब्लॉकच्या भिंतीऐवजी लाल विटेच्या, कच्च्या विटेच्या, दगडाच्या भिंती, सिमेंट प्लास्टरऐवजी माती/चुन्याच प्लास्टर, आर्टिफिशिअल/ डिजिटल टाईल्स ऐवजी कोटा, शहाबाद, भाजलेल्या मातीच्या टाईल्स ह्याचे महत्व लक्षात आले आहे.

याच सर्व गोष्टींचा वापर करून बांधलेली घर, वाडे, महाल, किल्ले, मंदिरे शेकडो वर्ष झाली पण अजूनही त्यामध्ये गेल्यावर आपल्याला सुखद व आल्हाददायक अनुभव मिळतो. ह्यामध्ये जे आपण मटेरिअल वापरतो, ते निसर्गातून सहज पणे मिळालेले असे ज्यात निसर्गाची हानी होणार नाही किंवा कमीत कमी कशी होईल याची काळजी घेतली जाते. विशेष म्हणजे हे बांधकाम जुने झाले, मोडकळीस आले तरीही यात वापरलेले मटेरियल आपण पुन्हा नव्याने वापरू शकतो जो अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे, जे आपल्याला RCC च्या बांधकामात करता येत नाही. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे स्टील आणि सिमेंट तयार करण्यासाठी निसर्गाला खूप मोठ्या प्रमाणावर हानी केली जाते तीही आपण या निमित्ताने कमी करण्यात खारीचा वाट उचलू शकतो.

आपण कश्या प्रकारे आपल्या बांधकामात या जुन्या पद्धतीचा नव्याने आत्ताच्या जीवनशैलीशी सुसंगत असा वापर करू शकतो, हे थोडक्यात खालील प्रमाणे समजून घेऊ.

घरांचे प्रकार : घर कुठल्या पद्धतीचे असावे हे खरं तर त्याभागातील हवामान, भौगोलिक परिस्थिती, ह्यावर ठरत असते. म्हणूनच आपण कोकणात गेलो कि लाल चिराच्या दगड व कौलारू घर दिसतात, मराठवाड्यात काळ्या दगडातील चौकाचे वाडे दिसतात. त्यामुळे आपण ह्या गोष्टीचा विचार करूनच बांधकामाचे प्लॅनिंग करायला हवं जेणे करून आपल्याला त्या वास्तूमध्ये नैसर्गिक हवा, प्रकाश व आल्हाददायक वातावरणाचा अनुभव मिळेल.

लोड बेअरिंग बांधकाम : आपल्या जमिनीची गुणवत्ता तपासून साधारण १ – २ मजल्यापर्यंत चे बांधकाम लोड बेअरिंग पद्धतीचा वापर करून दगडात घेता येते. यामध्ये RCC फुटिंग, कॉलम ह्याची आवश्यकता खरं तर नसते तर काही ठिकाणी जागेची किंवा जमिनीच्या गुणवत्ते नुसार अडचण असेल तर पार्ट लोड बेअरींग (Composite) ज्यामध्ये फक्त RCC बीम घेऊन त्यावर कॉलम शिवायच्या भिंतीच बांधकाम करू शकतो.

भिंतीचे प्रकार : आपण लाल विटेच्या भिंती तर नेहमीच बघतो पण दगडाच्या, मातीच्या कच्च्या विटेच्या भिंतीचा उपयोगही आपण करू शकतो. त्यामध्येही ज्यास्त तापमान असलेल्या भागात आपण पोकळी (Cavity wall) असलेली भिंत बांधू शकतो ह्याचा उपयोग आपल्या घरातील तापमान नियंत्रित राहण्यासाठी होतो. तसेच भिंतीचे बांधकाम करताना त्यामध्ये आपण सुंदर कमानी, विटेच्या विविध डिझाईनच्या जाळीचे पॅटर्न करू शकतो ज्यामधून हवा खेळती राहील.

छताचे प्रकार : वेगवेगळ्या गरजेप्रमाणे किंवा आवडीप्रमाणे छताचे प्रकार वेगवेगळे असू शकतात. ह्यामध्ये आपल्याला RCC स्लॅब आणि कौलारू छत प्रामुख्याने माहिती आहे परंतु आपण फिलर स्लॅब, प्लॅन्क ॲण्ड जॉईस्ट, विटेचे उथळ घुमटाचा स्लॅब, विटेचा अर्ध कमानीचा स्लॅब (Vault) असे अनेक प्रकारे आपण छत/स्लॅब बनवू शकतो. जे दिसतानाही सुंदर दिसतात तसेच त्याला पीओपी/ फॉल्स सिलिंग करण्याची आवश्यकता राहत नाही.

तापमानातही फरक पडतो तसेच स्टील, सिमेंट/कॉंक्रीटचा वापरही कमी होतो.

प्लास्टर : सध्या बांधकामात प्लास्टर हा अविभाज्य घटक बनला आहे पण जर आपण मुळातच बांधकाम लक्षपूर्वक केले असेल तर प्रत्येक ठिकाणी प्लास्टर करण्याची खरंच गरज नसते. चांगले विटांचे किंवा दगडाचे बांधकाम हे प्लास्टर न करताही सुंदर दिसू शकते. आपण सिमेंट प्लास्टर व्यतिरिक्त वेगवेळ्या पद्धतीचे प्लास्टर करू शकतो. जसे की माटीचे, चुन्याचे, सुरखीचे प्लास्टर. यामुळे आपल्याला नैसर्गिक व पारंपरिक अनुभव मिळतो.

फ्लोरिंग : कोटा, शहाबाद, भाजलेल्या मातीच्या टाईल्स (Clay Tile), कलर IPS या नैसर्गिक पर्यायांचा वापर करून आपण सुंदर काम करू शकतो. ह्यामुळे आपल्याला गुडघे दुखी, पायाला वात यासारखे आजार होत नाही.

कारण यामध्ये तापमान संतुलित राहते. इलेक्ट्रीकल/ लाईट फिटिंग : ओपन लाईट फिटिंग हे सुद्धा सुंदर पद्धतीने करू शकतो. यामध्ये वायरिंग, पाईप व लाईट्सचे सुयोग्य नियोजन करून जसे आहे तसेच सुशोभित करतात. काहीही लपवण्याचा हेतू नसतो. सध्या कमर्शिअल ऑफिसेसमध्येही याचा वापर सुंदर पद्धतीने होताना दिसतो.

आतापर्यंत आपण जे मुद्दे पहिले या मध्ये RCC (स्टील–सिमेंट) पूर्णतः चुकीचं किंवा वाईट असे नाही कारण मोठ्या इमारती बांधण्यासाठी ते आवश्यक आहेच परंतु आपण ते जबाबदारीने वापरावे हा उद्देश आहे. यामध्ये प्रत्येकाने निसर्गाला यामुळे काय हानी होत असेल याचा थोडा अभ्यास करून विचारपूर्वक शक्य तितका पर्यावरण पूरक (Ecofriendly) पद्धतीचा अवलंब करावा. ह्याचे असंख्य फायदे आपल्याला व आपल्या कुटुंबाला मिळू शकतात फक्त आवश्यकता आहे ती आपली जागरूकता, इच्छाशक्ती, निसर्गावरील प्रेम, थोडा संयम आणि समविचारी लोकांनी एकत्र येण्याची आहे. आताच्या आधुनिक वेगवान जगात विकास करताना आपण प्रत्येकाने जर हा खरीचा वाटा निसर्गासाठी उचलला तर नक्कीच थंबे थंबे, तळे साचे हि म्हण आपण प्रत्यक्षात आणू शकतो.

माझ्या कामाच्या माध्यमातून काही प्रमाणात मी ही यासाठी प्रयत्न करतो आहे. त्यातील काही प्रोजेक्ट्सचे फोटो दिले आहेत.

१. जेठले फार्म हाऊस, श्रीरामपूर २. वाबळे फार्महाऊस, अ.नगर ३. मंत्रमुग्ध बंगलो ४ – ५. सूर्यवंशी फार्महाऊस, मिरजगाव ६. इको रो हाऊस, जामखेड ७. संजयनगर झोपडपट्टी पुनर्वसन (PM-AY-U), अ.नगर (फोटो क्रेडिट– राजेश वोरा) यासाठी CDA, मुंबई सोबत आर्किटेक्चरल कन्सल्टन्ट ८. अवॉर्ड. लॉंगी बेकर यांचे काम (फोटो क्रेडिट: गूगल)

महत्वाची उद्दिष्टे :

* निसर्गाची हानी/ नुकसान कमी करण्याचा प्रयत्न.
* आपल्या जुन्या लोप पावत चाललेल्या पारंपरिक बांधकाम पद्धतीमागचे विज्ञानाचे संवर्धन.
* आरोग्यदायी जीवन जगण्याच्या दिशेने वाटचाल.
* गावामध्ये कुशल कारागिर तयार करून त्यांना गावातच रोजगार मिळावा.
* निसर्गाशी एकरूप होणारी त्या ठिकाणाला अनुरूप घरे असावी.
* स्टील–सिमेंट यांचा जबाबदारीपूर्वक गरजेनुसार वापर व्हावा.
* सर्व सामान्यांमध्ये आपलं जुनं तेच सोनं आहे हे पोहचवणं आणि त्याच महत्व पटवून देणं.

BURHADE ARCHITECTS

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर
Reg. No. MH-1/2011/01 | F-1000-1900/2001
www.aesanagar.com
AESA

आर्किटेक्ट : स्वप्निल विजय बुऱ्हाडे
बी. आर्च, AOA, मुंबई (२०१३)
बुऱ्हाडे आर्किटेक्टस I KNOT डेव्हलपर्स
सावेडी, अहिल्यानगर
Email : burhadearchitectsgmail.com
मो. नं. ९५८४४१६२०

सीएसआरडीचे डॉ. सुरेश पठारे यांची राष्ट्रीय पातळीवर बहुमताने निवड

समाजकार्याच्या क्षेत्राला नवी दिशा

नगर – येथील बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी सामाजकार्य व संशोधन संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांची नुकतीच नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडिया (NAPSWI) च्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या समाजकार्याची राष्ट्रीय संघटना नॅप्स्वीच्या नूतन कार्यकारणी निवडीसाठी नुकतीच निवडून प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्या अनुषगाने हरियानातील सोनीपत येथील भगत फुलसिंग महिला विद्यापीठात आयोजित भारतीय समाजकार्य परिषदेत पठारे यांना बहुमताने विजयी घोषित करण्यात आले. या निवडीमुळे देशातील सामाजिक कार्य क्षेत्रासाठी नवी दिशा निश्चित केली जाईल, असे मानले जात आहे.

सी.एस.आर.डी.चे डॉ. सुरेश पठारे यांची राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करताना नॅप्स्वीचे नवी दिल्ली येथे प्रा.डॉ. संजय भट्ट आदी.

डॉ. सुरेश पठारे हे नॅप्स्वीचे संस्थापक सदस्य असून त्यांनी संस्थेच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून त्यांनी सचिव म्हणून कार्य करत अनेक राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यांनी समाजकार्य शिक्षण क्षेत्राला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आणि समाजकार्याला व्यावसायिक स्वरूपात मान्यता मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत. डॉ. पठारे यांच्या नेतृत्वाखाली समाजकार्याच्या माध्यमातून सामाजिक समस्यांच्या प्रभावी सोडवणुकीसाठी विविध कार्यशाळा, परिषदा, आणि संवाद सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजकार्य व्यवसायाला समाजात अधिक प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्याची व्याप्ती वाढावी आणि अधिक युवकांना या क्षेत्रात आकर्षित करावे, यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे नॅप्स्वीची विचारधारा अधिक व्यापक होऊन देशभरातील समाजकार्य व्यावसायिकांना दिशानिर्देश मिळवून दिले जात आहेत.

डॉ. पठारे यांची उपाध्यक्षपदी झालेली निवड समाजकार्य शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची गोष्ट असून भारतातील समाजकार्य शिक्षणाला एक नवीन उंची मिळण्यास मदत होईल. त्यांच्या निवडीमुळे समाजकार्य शिक्षणाचे व्यापक आणि शैक्षणिक दृष्टिकोनास प्रोत्साहन मिळेल, तसेच अनेक नव्या धोरणांची आखणी होईल. विविध स्तरांतील समाजकार्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

डॉ. सुरेश पठारे यांच्या निवडीबद्दल सीएसआरडी संस्थेच्या प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांची ही निवड सीएसआरडीसाठीही गौरवाची बाब ठरली आहे. समाजातील विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाजकार्य क्षेत्रातील अनेकांनी डॉ. पठारे यांच्या कार्याला सन्मान दिला असून त्यांच्या पुढील कार्यकाळात समाजकार्य शिक्षणात सकारात्मक बदल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

डॉ. पठारे यांचे अनुभव, ज्ञान, आणि सामाजिक कार्याविषयीची बांधिलकी यामुळे नॅप्स्वीच्या उद्दिष्टांना नवीन ऊर्जाशक्ती मिळेल. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजकार्य शिक्षणाला अधिक व्यापक आणि समाजाभिमुख दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

डॉ. पठारे यांच्या सोबत नॅप्स्वीच्या नूतन कार्यकारणीत अध्यक्ष म्हणून नवी दिल्ली येथील जेष्ठ प्राध्यापक डॉ. संजय भट्ट, सचिव म्हणून लखनौ विद्यापीठातील डॉ. अनुप भारतीया, खजिनदार पदी नागपूर समाजकार्य महाविद्यालयाचे येथील प्राध्यापक डॉ. केशव वाळके, सह सचिव म्हणून पॉन्डिचेरी विद्यापीठातील डॉ. नलिनी रंगाचाल तर कार्यकारणी सदस्य म्हणून अनुक्रमे नागालँड येथील पीस सेंटर व नॉर्थ ईस्ट इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ॲन्ड रिसर्चचे प्राध्दर सी.पी. ॲन्टो, हरियाना येथील बीपीएस महिला विद्यापीठाच्या डॉ. मंजू पनवार, दिल्ली येथील नाडा या संस्थेच्या माध्यमातून व्यसनमुक्तीसाठी कार्यरत असणारे सुनील वात्सायन, ओडीसा येथील सॅच्युरियन विद्यापीठाचे डॉ. प्रदीप कुमार साहो, चंडीगड येथील पंजाब विद्यापीठाचे डॉ. गौरव गौर व केरळ येथील डॉ. के.आर. अनिश आदी निवडून आले आहेत.

मनपा अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचा १०० टक्के मतदानाचा संकल्प शपथ घेऊन करताना आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया – लहू दळवी)

महानगरपालिकेत अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचा १०० टक्के मतदानाचा संकल्प

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे : आयुक्त यशवंत डांगे

नगर – लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांनी सजगपणे मतदान करणे गरजेचे आहे. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत सर्व मतदार नागरिकांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेत मतदार जागृती व १०० टक्के मतदान संकल्प अभियान राबविण्यात आले. यावेळी ते बोलत होते. आयुक्त यशवंत डांगे यांनी उपस्थित नागरिक, कर्मचारी व अधिकाऱ्यांना मतदान संकल्पाची शपथ दिली. यावेळी उपायुक्त प्रियंका शिंदे, निखिल फराटे, सहायक आयुक्त सपना वसावा, मुख्य लेखाधिकारी सचिन धस, सहायक आयुक्त मेहेर लाहरे, अशोक साबळे, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजान, अनिल लोंढे, लक्ष्मण लांडगे आदींसह कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

पोदार इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक क्रीडा दिवस उत्साहात

नगर – अहिल्यानगर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचा आठवा वार्षिक क्रीडा दिवस सोहळा उत्साहात पार पडला. शाळेच्या मैदानावर या सोहळ्याचे उद्घाटन रनर क्लबचे जगदीपसिंग मक्कर, अभिनेत्री शैला टिके कुलकर्णी व पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य मंगेश जगताप यांच्या हस्ते झाले.

प्रारंभी राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धामध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी हातात मशाल घेऊन संचलन केले. शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धांना प्रारंभ करण्यात आले. विविध खेळामध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक तसेच विविध सांघिक खेळासाठी पाहुण्यांच्या हस्ते चषक देऊन सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट हाउस म्हणून टेरा हाउसला सांघिक चषक देण्यात आला.

जगदीपसिंग मक्कर म्हणाले की, शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्ही महत्त्वाचे आहे. त्यासाठी पालकांनी शैक्षणिक प्रगती बरोबर खेळाचे महत्त्व लक्षात घेऊन खेळात भाग घेण्यासाठी मुलांना प्रेरणा द्यावी. तसेच विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. खेळ हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे, त्यातून तुम्ही जास्तीत जास्त सक्षम होऊ शकता, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य मंगेश जगताप म्हणाले की, सध्याच्या स्थितीत मुलांचे मैदानी खेळ खेळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शाळेतील हा क्रीडा दिन आणि क्रीडा स्पर्धा मुलांना निश्चितच मैदानी खेळ खेळण्याकडे आकर्षित करतील. मुलांचा विकास होण्याच्या दृष्टीने मैदानी खेळ महत्त्वाचे आहे. त्यातून मुलांचा सर्वांगीण विकास होईल. मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शाळा नेहमीच विविध उपक्रम राबवते. नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी शाळेत असलेले पोषक वातावरणाची त्यांनी माहिती दिली.

पालकांची पोदार शाळेद्वारे एकवीसाव्या शतकात मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी देण्यात येणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबद्दल व खेळाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल कौतुक करुन शालेय प्रशासनाचे आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांना खेळाबद्दलच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी व नियमांचा आदर करण्याची शपथ देण्यात आली. शाळेचा ध्वज प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फडकविण्यात आला. शाळेच्या वॅटस, आक्रा, इग्रिस व टेरा गटातील विद्यार्थ्यांनी संचालन केले. याप्रसंगी या क्रीडा सप्ताहामध्ये झालेल्या क्रिकेट, खोखो, कबड्डी, हॉलीबॉल, थ्रो बॉल, रस्सीखेच, क्रिकेट अशा विविध सांघिक स्पर्धामध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व पदक देऊन गौरवण्यात आले. तसेच लहान मुलांसाठी धावणे, बुक बॅलन्सिंग, लिंबू चमचा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

इयत्ता पहिली ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्राव्हाक्षिके व नृत्याद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी विद्यार्थ्यांनी कवायत, मार्शलआर्ट, लाठीकाठी नृत्य, साडी नृत्य, लेझीम, पिरॅमिड असे विविध खेळाचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच यावेळी पालकांची धावण्याची स्पर्धा रंगली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे विद्यार्थी सार्थक दाँड, प्रणव चौधरी, जीवीता इंगळे, किनीशा पारख यांनी केले. आभार शाळेची हेड गर्ल रिचा बिहाणी हिने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य मंगेश जगताप, प्रशासन अधिकारी आशुतोष नामदेव सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि शाळेच्या पालक वर्गांनी परिश्रम घेतले.

पोदार इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक क्रीडा दिवस कार्यक्रमाचे उद्घाटन करताना रनर क्लबचे जगदीपसिंग मक्कर, अभिनेत्री शैला टिके कुलकर्णी व पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य मंगेश जगताप आदी व प्रात्यक्षिके दाखवताना मूले.

दुकानदारीचा अनुभव तुम्हाला भविष्यकाळात कामाला येणार

अरविंद पारंगावकर यांचे प्रतिपादन; परिवर्तन प्रतिष्ठान आयोजित चला दुकानदार होऊया या बालदोस्तांच्या प्रदर्शनास प्रतिसाद

नगर – 'दुकानदारीचा अनुभव तुम्हाला भविष्याकाळात कामाला येणार आहे. ग्राहकाभिमुखता म्हणजे जो ग्राहक आपल्या दुकानात आला आहे तो देव आहे असे मानले जाते त्यामुळे नाराज न करता त्याला जे हवे ते देणे प्रत्येक दुकानदार व व्यवसायिकांचे काम आहे हे सूत्र ठोकयात ठेवून तुम्ही व्यवसाय करा. अश्या उपक्रमात सहभाग घेउन तुमच्या उत्पादनांचे चांगले प्रेझटेंशन करा. तुम्ही जीवनात यशस्वी व्हाल. आपल्यात स्किल नसतील तर तरूणाईला चांगले काम करता येणार नाही. सर्वजण जर नोकरी करणार म्हटल्यात, त्या पुरणार नाहीत. त्यामुळे व्यवसायात आले पाहीजे. त्यामुळे परीवर्तनचा हा उपक्रम चांगला व कौतुकास्पद आहे.' असे अरविंद पारंगावकर म्हणाले.

कोहिनूर मंगल कार्यालयात दीपावलीनिमित्त पूर्वसंध्येला परीवर्तन प्रतिष्ठान आयोजित 'चला दुकानदार होऊया' बालदोस्तांसाठी भरवलेले प्रदर्शन या उपक्रमासह कै. माजी सैनिक पद्माकर रसाळ यांच्या चित्रांचे प्रदर्शन उद्घाटन झाले. (छाया – उदय जोशी)

सावेडी, गुलमोहर रोड, पारिजात चौकाजवळ कोहिनूर मंगल कार्यालयात दीपावलीनिमित्त पूर्वसंध्येला परीवर्तन प्रतिष्ठान आयोजित 'चला दुकानदार होऊया' अर्थात बालदोस्तांनी बालदोस्तांसाठी भरवलेले प्रदर्शन या उपक्रमासह कै. माजी सैनिक पद्माकर रसाळ यांच्या चित्रांचे प्रदर्शन उदघाटन झाले. यावेळी शिल्पकार प्रमोद कांबळे, उद्योजक अरविंद पारगांवकर, श्रीमती नलिनी रसाळ (कै. श्री. रसाळ यांच्या पत्नी), उद्योजक मिलिंद गंधे, उद्योजक, उद्योजक सौ. आसावरी नातू, उद्योजिका भूपाली निसळ, छायाचित्रकार संजय दळवी, परिवर्तन प्रतिष्ठानाचे अध्यक्ष रविंद्र करंदीकर आदी उपस्थित होते.

'कै. पद्माकर रसाळाची चित्रे पाहून मन हरखून गेले. या वयात काढलेली चित्रे सुंदर व आखीव रेखीव आहेत.' असे सांगताना प्रमोद कांबळे म्हणाले की 'कै. पद्माकर रसाळांच्या सुप्त गुणांना या प्रदर्शनाच्या माध्यमातून वाव मिळाला आहे. या चित्राचा कायमस्वरूपी डिस्प्ले व्हावा. आपल्या कामाबद्दल आत्मविश्वास पाहीजे. सचोटी, प्रामाणिकपणे काम करावे. जे कराल ते युनिक असावे. आपण केलेले काम पटवून देता आले पाहीजे.' चित्रांचे प्रदर्शन पाहण्यासाठी व बालदुकानदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्विलेसाठी कार्यकारी मंडळ, महिला मंडळ संस्था, शिक्षकवृंद– 'बालक मंदिर महिला मंडळ प्राथमिक शाळा' तथा 'पालवी शिशु विहार' यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

चित्र प्रदर्शनाबाबत सौ. मृग्धा घोटणकर, तथा सौ. उमा जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात परीवर्तन प्रतिष्ठानबाबत माहीती संस्थेचे सदस्य शंतनु खानवेलकर यांनी दिली. आभार सौ. प्रज्ञा असनीकर यांनी मानले. सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले.

मतदानाचा हक्क बजवा आणि लोकशाही सुदृढ करा असे म्हणून ना. ज. पाऊलबुद्धे विद्यालयात विद्यार्थ्यांस युवक–युक्ती पालकांची जनजागृती करताना.

आई, ताई, बाबा, भाऊ, आजी–आजोबा मतदानाचा हक्क बजवा अन् 'लोकशाही सदृढ करा' : युवक – युवतींनी घेतली शपथ

नगर – विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणुक विभाग यांच्या निर्देशानूसार नेहरु युवा केंद्र, जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा ग्रंथालय कार्यालय, डॉ. ना.ज. पाऊलबुध्दे विद्यालय, श्री नवनाथ युवा मंडळ, स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व साई श्रध्दा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जागृती अभियान राबविण्यात आले.

वसंत टेकडी येथील डॉ. ना.ज. पाऊलबुध्दे विद्यालयातील शालेय विद्यार्थ्यांनी कुटुंबातील सदस्यांना कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा हक्क बजावण्याचा आग्रह धरण्याची शपथ देण्यात आली. तर महाविद्यालयीन युवक–युवतींनी देखील मतदानाचा हक्क बजावण्याचा संकल्प केला.

यावेळी पाऊलबुध्दे विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.एस. बिडवे, डॉंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डॉंगरे, साई श्रध्दा फाउंडेशनच्या अध्यक्षा अर्चना परकाळे, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डॉंगरे, प्रा. आशा गावडे, प्रा. रोहिदास चौरे, विनायक सापा, दिपक परदेशी, वैशाली शिर्के, लक्ष्मी चौरे, सुजाता दरे, अर्चना यंगळदास, वैशाली बूधकुळ, रावसाहेब पाखरे, प्रतिभा डॉंगरे–खोडदे, सायंबर आदी उपस्थित होते.

पै. नाना डॉंगरे म्हणाले की, धर्मनिरपेक्षपणे, प्रलोभनाला बळी न पडता व मिती न बाळगता केलेल्या मतदानाने लोकशाही सदृढ होणार आहे. सदृढ लोकशाहीसाठी चांगले उमेदवार निवडून येण्याची गरज असून, प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. मतदानाची कमी असलेल्या टक्केवारीतून योग्य व जनमतामधून उमेदवार निवडला जात नाही. यासाठी प्रत्येकाने कर्तव्य म्हणून मतदानाचा हक्क बजावियाचे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक बी.एस. बिडवे यांनी मतदानाचे महत्त्व सांगून उपस्थितांना मतदानाचे हक्क बजावण्याची व कुटुंबातील प्रत्येक सदस्याला मतदानाचा आग्रह धरण्याची शपथ दिली. या उपक्रम साठी नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी संकल्प गुप्तला, उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणुक अधिकारी राहुल पाटील, प्र. जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, लेखापाल सिध्दार्थ चव्हाण, रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

'वॉरियर्स फाउंडेशन'कडून बालकांच्या तन आणि मनाची मशागत होत आहे

राजेंद्र चोभे यांचे प्रतिपादन

वॉरियर्स एज्युकेशन सेंटर ॲण्ड प्री प्रायमरी स्कूल, कॉटेज कॉर्नर येथे आयोजित दीपोत्सव कार्यक्रमप्रसंगी शब्दगंधचे राजेंद्र चोभे.

नगर – बालकांना भारतीय सण, संस्कृतीचे महत्त्व लक्षात येण्यासाठी राबवलेला दीपोत्सव उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून बालकांच्या तन, मनाची मशागत करण्याचे काम वॉरियर्स फाउंडेशन करत आहे, ही अतिशय प्रेरणादायी गोष्ट आहे, असे प्रतिपादन शब्दगंध साहित्यिक परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र चोभे यांनी व्यक्त केले.

वॉरियर्स एज्युकेशन सेंटर ॲण्ड प्री प्रायमरी स्कूल, कॉटेज कॉर्नर येथे आयोजित दीपोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालिका शर्मिला गोसावी या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून बजाजचे प्रशिक्षक नंदकुमार काळे हे होते.

पुढे बोलताना राजेंद्र चोभे म्हणाले की, या परिसरातील छोट्या बालकांसाठी वॉरियर्सच्या माध्यमातून सुरू झालेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून लहान मुलांच्या मानसशास्त्राचा विचार करून त्या पद्धतीने सण, उत्सव साजरे करण्यात येतात. अभ्यासासोबतच इतर सांस्कृतिक उपक्रम राबवून महनीय व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात, ही बालकांवर संस्कार करण्याची निरंतर प्रक्रिया प्रेरणादायी आहे.

नंदकुमार काळे आपल्या मनोगतात बोलताना म्हणाले की, मुलांच्या मनाचा कल लक्षात घेऊन त्यांना त्या प्रमाणात, त्या त्या प्रकारचे शिक्षण उपलब्ध करून दिल्यास सर्वांगीण विकास होऊ शकतो. त्यासाठी वॉरियर्सने पुढाकार घेतल्यास आपण निश्चितच सहकार्य करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

संचालिका शर्मिला गोसावी यांनी वॉरियर्सच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. छोट्या बालकांनीही फटाके फोडून दिवाळीचा आनंद व्यक्त केला, छत्रपती शिवराय्यांचा राजगडाची प्रतिकृती यावेळी उभारण्यात आली होती. विविध वेषभूषेतील बालकांनी दीपावली दीपोत्सवाचा आनंद घेतला. यावेळी श्रुतिका घोडेस्वार व वर्षा गुजर, संगीता गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक सचिव सुनील गोसावी यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर प्रायोगिक शिक्षणाचा पाया विद्यार्थीदशेतच रुजवला जावू शकतो

कुलगुरु डॉ. पराग कालकर यांचे प्रतिपादन; डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकीत राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० या विषयावर कार्यशाळा

नगर – राष्ट्रीय शिक्षण धोरण अभियांत्रिकी शिक्षणात समग्रपणे कसे वापरता येईल, ज्यामुळे सध्याच्या बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर प्रायोगिक शिक्षणाचा पाया विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांमध्ये रुजवला जावू शकतो. याच्या प्रभावामुळे विद्यार्थी शिक्षणातून मिळालेले तांत्रिक कौशल्य प्रभावीपणे व्यावहारीक जीवनात उपयोगात आणु शकतात त्यासाठी कौशल्य विकास आणि प्रायोगिक शिक्षण कसे द्यावे याचे तंतोतंत आणि प्रभावी मार्गदर्शन नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण देत आहे. याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात ईको सिस्टीम तयार करुन विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रायोगिक शिक्षण देता येईल जेणेकरुन विद्यार्थी बदलत्या जगाबरोबर तसेच सध्याच्या स्पर्धात्मक युगात यश संपादन करु शकतील असे प्रतिपादन प्र.कुलगुरु डॉ. पराग कालकर केले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकीत राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० या विषयावर कार्यशाळेत मुख्य अतिथी प्र. कुलगुरु डॉ. पराग कालकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदशन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे विश्वस्त ॲड. वसंतराव कापरे, डॉ. प्रमोद पाटील (डीन, फॅकल्टी ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी) तसेच डॉ. निलेश उन्के (चेअरमन, विद्यापीठ अभ्यास मंडळ, कॉम्प्युटर इंजि. विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) हे लाभले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकीत राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० या विषयावर कार्यशाळेत मुख्य अतिथी प्र. कुलगुरु डॉ. पराग कालकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदशन केले.

या कार्यक्रमासाठी डॉ. अभिजीत दिवटे (संचालक, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फॉउंडेशन कॉलेज), डॉ. पी.एस.गायकवाड (सेक्रेटरी जनरल (प्रभारी), सुनिल कल्हापुरे (डेप्युटी डायरेक्टर टेक्निकल), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय पी. नाईक तसेच डायरेक्टर, आय.बी.एम.आर.डी. डॉ. एस. एम. धर्माधिकारी तसेच डॉ. पी.वाय. पवार (प्राचार्य, औषधनिर्मानशास्त्र महाविद्यालय) आदींची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याकडे लक्ष देतेच, त्याचबरोबर विद्यार्थ्यांमधील व्यक्तिमत्व विकास, तांत्रिक कौशल्य विकास व संभाषणकौशल्य तसेच विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. त्याचाच एक भाग म्हणून डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फॉंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, आय.बी.एम.आर.डी., औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० ची प्रभावी अंमलबजावणी कशी करण्यात यावी जेणेकरुन विद्यार्थ्यांना कौशल्य विकासात्मक शिक्षण मिळेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढून आवडीच्या क्षेत्रात यश संपादन करतील या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. उदय नाईक यांनी पाहुण्यांचे स्वागत करन सध्याच्या आधुनिक जगामध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेबरोबर चालायचे असेल तर राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यांचा अंगिकार केला पाहिजे असे सांगितले. यावेळी सर्व पाहुण्यांचा सत्कार करुन त्यांची ओळख डॉ. एस.एम. धर्माधिकारी, डॉ. डी.ए. विघाते तसेच प्रा. पी. एस. गायके यांनी करुन दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ॲड. वसंतराव कापरे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील महाविद्यालयामध्ये सर्व शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी आणि त्याचे फायदे समजावून सांगितल्याबद्दल आभार व्यक्त केले.

डॉ. प्रमोद पाटील यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेऊन राष्ट्रीय शिक्षण धोरणातील विविध पैलु सहजपणे उलगडून त्यांचा प्रभावीपणे व्यावहारिक वापर कसा करावा, त्यामुळे विद्यार्थी शिकत असलेले ज्ञान तसेच त्यांच्या आवडीनुसार निवडलेले विविध विषयातील आकलन प्रभावीपणे व्यावहारीकदृष्ट्या कसे उपयोगात आणु शकतील याचे मार्गदर्शन केले तसेच नविन शैक्षणिक धोरणात वेगवेगळ्या विद्याशाखांना एकत्रित घेवून विद्यार्थ्यांना ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित केलेले आहे. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरण हे शिक्षक केंद्रित विद्यार्थी कल केंद्रित कसे करता येईल यादृष्टीने महाविद्यालय प्रयत्नशील रहावे, ज्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांचाही विकास होउन नवनवीन संशोधनास वाव मिळेल.

डॉ. निलेश उन्के यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आधुनिक शिक्षण प्रणालीचा वापर करुन शिक्षणात रुची कशी निर्माण करता येईल तसेच विविध ऑनलाईन प्रणालींचा वापर करुन शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण करु शकतात असे सांगितले. यावेळी महाविद्यालयात नव्याने सुरु करण्यात आलेल्या संगणक अभियांत्रिकी विभागाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. डी.ए. विघाते, विभागप्रमुख आय.टी. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूजा वैकर आणि प्रा. प्राजक्ता डोलारे यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन डॉ. पी. वाय. पवार, प्राचार्य, औषधनिर्मानशास्त्र महाविद्यालय यांनी केले.

या आयोजनासाठी संस्थेचे सेक्रेटरी जनरल (ऑफीसिएटींग) डॉ. पी.एस. गायकवाड व उपसंचालक सुनिल कल्हापुरे तसेच प्राचार्य डॉ. उदय पी. नाईक यांनी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले.

पोकळ आश्वासने देऊन सत्ताधाऱ्यांनी फक्त घरकुल वंचितांच्या मतांचा मलिदा लाटला

दिवाळी पाडव्याला घरकुल वंचितांची होणार लोकशाही बुकात नोंद, केलेल्या घोषणांचा होणार सूर्यनामा

नगर – शहरात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या वीस हजार घरकुल वंचितांना आजपर्यंत एकही घर मिळालेले नाही. फक्त आश्वासने देऊन घरकुल वंचितांच्या मतांचा मलिदा लाटण्याचे काम सत्ताधारी यांनी केले असून, दिवाळी पाडव्याला भनिवारी (दि.२ नोव्हेंबर) हुतात्मा स्मारकात घरकुल वंचित आपली लोकशाही बुकात नोंद करुन सरकारने घरकुल वंचितांसाठी केलेल्या घोषणांचा सूर्यनामा करणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या पुढाकाराने शनिवारी सकाळी ११ वाजता हा सूर्य, हा पुतना मावशीचा कुंपणावर बसलेला लोकमन्याय आणि हे स्वातंत्र्यातील ७७ वर्षानंतर सुद्धा घर निवारा न मिळालेले घरकुल वंचित असा सूर्यनाम्याचा स्वरुप असणार आहे.

लोकमन्यी, ज्ञानमंत्री आणि कर्मभक्तीचा दीपस्तंभ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करुन हा सूर्यनामा केला जाणार आहे. सन २०१५ नंतर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे घरकुल वंचितांना घर (निवारा) देण्याची घोषणा केली. शहरी भागामध्ये मोकळ्या जागांचे बाजार भाव गगनाला भिडले आहेत. हजारो गुंठा मंत्र्यांनी या संधीचा फायदा उठविला. त्यातच नगर शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात ताबेमारी, गुन्हेगारी, टक्केवारी व फ्लेक्स दादोदारी यातून आमदार–खासदार होता येते, ही बाब सूर्यप्रकाशइतकी लख्खपणे अनुभवता येत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

ताबेमारीतून हजारो गुंडागर्दी करणाऱ्या रोजगार मिळायची संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे साड्यांचे वाटप, रांगोळ्या, फुगड्या, मेहंदी अशा कार्यक्रमातून लोकप्रतिनिधी होता येते, ही बाब जनतेच्या मनावर बिंबवली जात आहे. स्वातंत्र्याच्या ७७ वर्षात सुद्धा झोपडपट्ट्या वाढत चाललेले आहेत. आय–बहिर्णिना नालीच्या कडेला उघड्यावर आंघोळ करावी लागते, याची खंत लोकमकाच्या आमदार खासदारांना नाही. गरीब दुबळ्या लोकांना संध्याकाळची भ्रांत असल्यामुळे त्यांना दीर्घ काळ आंदोलन चालविता येत नाही. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना निवाऱ्याचा मूलभूत अधिकार घोषित केलेला आहे. परंतु आज दहा बाय दहाच्या खोलीत मुला माणसांसह दहा लोकांना रहावे लागते. त्यातूनच मुलांचे चांगले शिक्षण होत नाही. त्यातच केंद्रातील तिसऱ्या आघाडीतील नेते चंद्रबाबू नायडू यांनी लोकसंख्या विस्फोटाचा बॉम्ब दिवाळीच फटाका म्हणून दक्षिणेतील लोकांना भेट दिला आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडून लोकमकाच्या लोकप्रतिनिधींनी वेड्या बाभळीची शेती सुरु ठेवली असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

लोकशाही बुकात घरकुल वंचितांची नोंद करुन, भविष्यात राज्यात स्थापन होणाऱ्या नवीन सरकारला ते बुक पाठविले जाणार आहे. या सूर्यनाम्यासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कानडू सुंबे, अशोक भोसले, वीरबहादूर प्रजापती, कैलास पठारे, सुधीर भट्टे, बिझुल सुरम आदी प्रयत्नशील आहेत.

कामामुळे नगरकरांनी हातात घेतली निवडणूक

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; निवडणुकीच्या प्रचारार्थ तोफखाना, बागडपट्टी परिसरातील नागरिकांशी साधला संवाद

निवडणूक प्रचारार्थ तोफखाना, बागडपट्टी परिसरात नागरिकांशी संवाद साधताना आ.संग्राम जगताप यांचे औक्षण करताना महिला.

नगर – नगर विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहे. मागील दहा वर्षांमध्ये केलेली विकास कामे व जनतेच्या सुखदुःखात सामील होत थेट संपर्क ठेवला असल्यामुळे ऋणानुबंध निर्माण झाले असून आता माझी निवडणूक थेट जनतेनेच हाती घेतली आहे. तोफखाना बागडपट्टी सर्जेपुरा परिसरामध्ये नागरिकांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेलो असता उत्साहात स्वागत केले. यावेळी नागरिकांच्या वतीने ठिक–ठिकाणी फुलांचाच वर्षाव आणि फटाक्याची आतिषबाजी करण्यात येत होती, जनतेचे प्रेम पाहून माझा विजय निश्चित झाला आहे त्यामुळे तिसऱ्यांदा नगरकरांची सेवा करण्याची संधी मिळणार आहे, विकास कामांच्या मुद्द्यावर निवडणूक लढवत असून केलेली विकास कामे नागरिकांच्या घरापर्यंत घेऊन जाण्यास यशस्वी झालो आहे. नागरिकांनी दिलेल्या गणपती मंदिर, ठाकूर गल्ली, परदेशी गल्ली, नवरंग गल्ली, शेरकर गल्ली, लोणार गल्ली परिसरातील नागरिकांशी विकास यात्रेच्या माध्यमातून संवाद साधला.

यावेळी अंबादास पंधाडे, माजी उपमहापौर दीपक सूळ, मालनताई ढोणे, माजी नगरसेवक धनंजय जाधव, कालिंदी केसकर, गुलाबराव पवार, सारंग पंधाडे, सुरज जाधव, पोपट पाथरे, अजय साळवे, राजेंद्र बोगा, अभिजित चिप्पा, बेला पंधाडे आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

धम्माल मनोरंजन

मनोरंजक शब्दकोडे



आडवे संकेत

१) एकाचाच कारभार
५) नेहमी खोटे बोलणारा
९) कुत्कुर, भांडण
१०) एक मादक द्रव्य
११) स्वावलंब पाळणारा
१४) मासा, एक रास
१६) खो-खो च्या खेळात उठ म्हणण्याचा शब्द
१७) व्यभिचारी १८) लाट, नाश, मोड २०) डोक्यावर केस नसणे २२) बरपक्षांना विश्रांतीसाठी दिलेली जागा
२४) देव, ईश्वर
२६) मिळकत २७) दुरुस्ती
२९) याचा गोद होतो
३०) एक अरबी महिना
३२) जुवा खेळणारा
३४) कामाची इच्छा धरुन असलेला ३५) एक आडनाव
३६) रेषा, रेखा ३८) पुढे, नंतर
३९) प्राणावरील संकटात अविचाराने शिरकाव
४१) पती मरण पावलेली
४२) स्त्रत्न, माळेतला गोलक
४३) पुंगळी ४४) एक वनस्पती
४६) घिरटी, उडी ४९) एक मराठी महिना ५०) विष्णूचा एक अवतार ५१) हिशेब तेवणारा पाटलाचा अधिकारी
५२) वायु, हवा ५४) माहिती असलेला ५५) वाईट सवय
५६) हिंस्त्रपणा सोडलेला
५७) भिती

उभे संकेत

१) फक्त एक वेळा
२) हात, टॅक्स
३) अंतरणे, हानी पावणे
४) एक पातळ खाद्य
६) वचनाची पूर्ती तोडणे, दिलेला शब्द न पाळणे
७) मोठा आवाज २)
विजयादशमी १२) दिलेला शब्द
१३) सागाची एक जात
१५) स्पष्ट, उजेड
१९) बांधकाम २०) धडक
२१) खोड, दुर्गुन
२२) एक फूलझाड
२३) दशाक्षम करणारी एक जात
२४) एक खाद्य२५) अस्थिर
२८) बसताना आलेली निद्रा
३१) विष ३३) झुकविणे
३५) श्रावण शु. १५
३६) पंच, अडल्या
३७) अक्षिदा वाटण्याचे ठिकाण
३९) मधोमध ४०) हृदय, इच्छा
४५) मूळाक्षरे ४६) मजूर
४७) एक प्राणी ४८) नजर ठेऊन ५०) लवकर न तुटणारा
५१) इंग्रजीत थंड
५२) वेळू
५३) एक धूप द्रव्य

सुविचार

तुलना करावी, पण अवहेलना करु नये.
तात्पर्य : अनेक बाबतीत दुसऱ्यांशी तुलना करावी. त्यामुळे आपल्यातील दोष कमी होऊन आपल्यात सुधारणा होते. आपल्या प्रगतीसाठी तुलना आवश्यक आहे, परंतु आपल्यापेक्षा दुसऱ्याचे कार्य वेगळे असेल, दुसऱ्याची मते वेगळी असतील, तर त्या गोष्टी वाईट आहेत, असे मानून दुसऱ्यांना नावे ठेवू नका. नोकळ्या मनाने त्यांचेही कौतुक करा.

मंथन

ईश्वरी कृपा!

एकदा एका दुष्ट मनुष्याने आपल्या गरूड्या घरात सोडण्यासाठी एक भयंकर विषारी सर्प पकडला व त्याला मडक्यात बंद करुन तो निघाला. वाटेत एक नाला होता. त्या नाल्यावर बांबूचा तात्पुरता पूल बांधला होता. तो त्या बांबूरुन जात असता तो बांबूचा पूल मोडला. तो दुष्ट खाली पाण्यात पडला. साहजिकच मडक्यातील सर्प बाहेर पडून पळून गेला. केवळ याच परमेश्वरी घटनेने त्याचा शत्रू वाचला.

नंतर एके दिवशी तो दारुच्या नशेत रस्त्याने जात असता कुणीतरी भजन करीत असलेले पुढील शब्द त्याच्या कानावर आले–

अनाथांच्या नाथा,
विश्वाच्या रक्षका। रक्ष या बालका जरी अपराधी।।

नको मज मारु, अरे विश्वोध्दारु। काय सांग करु मायबाबा।।

अगदी योग्य क्षणीच त्याला हे शब्द ऐकावयास मिळाले. त्याचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. परमेश्वराची ती कृपाच होती आणि त्याचा जणू पुनर्जन्मच झाला. त्याने वैर सोडून दिले. दुष्ट विचारांचा त्याग करुन तो सरळ जीवन जगू लागला.

स्वस्तिक शब्दकोडे

आडवे संकेत

२) फुलांचा राजा
३) गुळाची पाण्डी
५) लहान नौका

उभे संकेत

१) आंध्रप्रदेशातील भाषा
२) साडेतीन मुहुर्तापैकी एक
४) अप्परच्या विरुद्ध

मागील आडवे उत्तर:- चमक, मंदिरालय, महान

मागील उभे उत्तर:-झेलम, चतुरानन, यजक

दिनविशेष ०१ नोव्हेंबर२०२४

१८८८: चित्रकार, नेपथ्यकार, रंगभूमिविषयक ग्रंथांचे लेखक पुरुषोत्तम श्रीपत काळे यांचा जन्म.

१८९३: इंदुभूषण बॅनर्जी – शीख धर्माचा समग्र इतिहास लिहिणारे आधुनिक बंगाली इतिहासकार (मृत्यू: १३ नोव्हेंबर १९५६ १८७३ : – कोलकत्ता, पश्चिम बंगाल)

१९१८: विनोदी अभिनेते शरद गणेश तळवळकर यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट २००१)

१९२१: शरद तळवलकर – आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (मृत्यू: २१ ऑगस्ट २००१)

१९२६: यशवंत देव – संगीतकार व गीतकार

१९४०: रमेश चंद्र लाहोटी – भारताचे ३५ वे सरन्यायाधीश

१९४५: महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑगस्ट २०१३)

१९६०: ॲपल इन्कचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी टीम कूक यांचा जन्म.

१९६३: भारतीय उद्योजीका नीता अंबानी यांचा जन्म.

१९७३: ऐश्वर्या राय – अभिनेत्री

१९७३: भारतीय अभिनेत्री रुबी भाटिया यांचा जन्म झाला.

१९७३:२ : अरुण बाळकृष्ण कोलटकर – मराठी व इंग्रजी कवी (मृत्यू: २५ सप्टेंबर २००४)

१९७४: वी. वी. एस. लक्ष्मण – क्रिकेटपटू

१९८७: भारतीय अभिनेत्री इलियाना डिक्रूझ यांचा जन्म झाला.

२००४: बेनेट किंग मध्ये वेस्ट इंडीज क्रिकेट बोर्डाचा पहिला परराष्ट्र प्रशिक्षक बनला.

मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:

१८७३: दीनबंधू मित्र – बंगाली नाटककार (जन्म: ? ? १८२९ – चौबेरिया, गोपालनगर, २४ परगणा, पश्चिम बंगाल)

१९२४: प्रसिद्ध कथा लेखक आणि हिंदी साहित्यिक रामकिणकर उपाध्याय यांचा जन्म मध्ये झाला.

१९३०: उर्दू भाषेचे प्रख्यात लेखक आणि कवी अब्दुल क़ावी देसनावी यांचा जन्म.

१९४२: हिंदी भाषेचे प्रख्यात कादंबरीकार, कवी व स्त्रीवादी विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते प्रभा खैतान यांचा जन्म मध्ये झाला.

१९४८: प्रख्यात राजकारणी आणि संसदीय कार्य राज्यमंत्री संतोष गंगवार यांचा जन्म मध्ये झाला होता.

१९५०: विभूतीभूषण बंदोपाध्याय – जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (जन्म: १२ सप्टेंबर १८९४)

१९६४: भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांची पत्नी नीता अंबानी यांचा जन्म झाला.

१९८०: भारतातील आघाडीचे स्वातंत्र्यसेनानी असलेले दामोदर मेनन यांचे मध्ये निधन झाले.

१९८८: ज्येष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांचे पुणे येथे निधन.

१९९१: अरुण पौडवाल – संगीतकार व संगीत संयोजक (जन्म: ? ? ????)

१९९४: कॉम्रेड दत्ता देशमुख – शेती आणि पाणी विषयाचे तज्ञ, कामगार नेते (जन्म: ? ? ????)

१९९६: ज्युनिअस जयवर्धने – श्रीलंकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७ सप्टेंबर १९०६)

२००५: योगिनी जोगळेकर – लेखिका, ४५ कादंबऱ्या, ४ कवितासंग्रह, ४ नाटके, १२ कुमार वाङ्मयाची पुस्तके इ. त्यांची साहित्य संपदा आहे. (जन्म: ६ ऑगस्ट १९२५)

फळे व आरोग्य

आलं व सुंठीतील फरक

हे कंद जेव्हा ओला असतो तेव्हा त्याला आलं, अदरक असे म्हणतात. तोच कंद वाळला असता त्याला सुंठ म्हणतात. दोन्ही मूलतः एकच असले तरी दोघांच्या गुणधर्मात खूप फरक आहे.

आलं हे कटु, उष्ण, तीक्ष्ण व रुक्ष असल्याने कफाचा नाश करणारे आहे. म्हणून पावसाळ्यात, हिवाळ्यात त्याचा वापर मुद्दाम जास्त करावा. आलं हे अग्निदीपक आहे. भूक लागत नसेल, अजीर्ण झाले, तोंडाला चव नसेल तर आले द्यावे. जेवणापूर्वी १/२ तास अगोदर आल्याचा तुकडा मिठासोबत खावा किंवा आल्याचा रस एक चमचा आणि थोडेसे काळे मीठ टाकून घ्यावे.

म्हणी व अर्थ

गोष्ट लहान, सांगणं महान.

अर्थः क्षुल्लक गोष्टीचा उदो करणे.

मनोरंजक शब्दकोडे

आडवे संकेत

१) नेर्डे नसलेली सुई
३) बारीक झालेले, आकुंचित
८) दु:खाची वेदना
१०) अखंड
११) बनाचा कर
१४) एक मोठे फळ
१६) स्पष्ट, मर
१७) इंग्रजी अक्षरांच्या मालिकेतील शेवटून दुसरे अक्षर
१८) क्विश्चन धर्मसेविका
२०) एकसारखे पाहणे
२२) दुरच्या स्त्रविषयी एक संबोधन, मालकीन
२५) नेहमी रडत राहणारी मुलगी
२७) एक प्रकारचा वृक्ष २८) रात्री पडणारा पाऊस
३०) वराती मागून ३१) मतांची भिन्नता

उभे संकेत

१) पायाची मागील बाजू २) हालचाल, उद्योग ४) उदर, नफा, कुरळ
५) लोखंडी पोषाख
६) एक फुलझाड
७) पिछेहाट, हार
९) एकसारखी बडबड १२) नाना प्रकारचे चमत्कारी खेळ करुन दाखविणारा, परमेश्वर
१३) एक मौल्यवान वस्तू
१५) जादूई काम
१६) ऐकण्यास कान किंवा डोळे लाट करणे
१९) नाही या अर्थी शब्द
२१) ठिपक्या रंगाचा
२३) घरती
२४) एक प्रसिद्ध ग्रंथ
२६) दु:ख, कष्ट
२९) नाद, सवय

मागील उत्तर

घ	र	ध	रा	व	णे		द	म	ट
र	मा	र	म	ण		ना	म	द्धा	र
म		प		ध	ज	न	दा	र	
घ	ड	क		ण		क	र		गा
क्का		ड		फि	दा			ना	व
	म		न	र	म	ग	र	म	
हा	ल	मा	र	णे		र		दे	व
	द्ध	ह	क		र	ग	रा	य	
चा	र			अं	ग	र	स		फि

आडवे संकेत फिल्मी शब्दकोडे



१) अर्जून रामपाल और ऐश्वर्या रॉय की फिल्म.
३) कम्पनी इस फिल्म में खल्लास गाने पे नाचनेवाली नायीका.
६) सन् १९९८ में रामगोपाल वर्मा की इस फिल्म में डी.के. चक्रवर्ती, उर्मिला मातोंडकर थे.
७) आप जैसा कोई मेरे जिंदगी में आये तो... यह कुर्बानी इस फिल्म का गाना इस गायीका ने गाया है.
१२) सन् १९९५ में बनी क्रिमीनल इस फिल्म की नायीका.
१४) सन् १९९६ में राज कंवर के निर्देशन में बनी इस फिल्म में सलमान खान, करिश्मा कपूर, सनी देओल थे.
१६) याद आ रही है तेरी याद आ रही है... यह लव्स्टोरी इस फिल्म का गाना इस गायक ने गाया है.
१९) अक्षय कुमार, करिना कपूर, सुरेश ओबेरॉय, राज बब्बर और आशिष विद्यार्थी अभिनीत एक फिल्म.
२०) सरदेसाई (गायीका)
२१) मिश्रा (सहनायीका)
२२) है प्यार का (फिल्म)
२५) रजनीगंधा इस फिल्म की नायीका.
२६) सन् २००२ में बनी इस फिल्म में बिपाशा बासू और डिनो मोरीया थे.
२७) सन् १९९४ में महेश भट्ट की इस फिल्म में अतुल अग्निहोत्री, शोनाली बेंद्रे, मिथून चक्रवर्ती थे.
२९) सन् १९९९ में ज्योतिन गोयल के इस फिल्म में संजय दत्त और जुही चावला थे.
३०) झुले झुलेलाल दम मस्तकलंदर सेवन ही सरकार दम मस्तकलंदर..... यह गाना इस फिल्म का है. ३२) दिल क्या (फिल्म)
३५) मैं प्यार का पुजारी मुझे प्यार चाहिए... यह गाना इस फिल्म का है.
३६) सन् १९९७ में राजीव बब्बर के इस फिल्म में जैकी श्रॉफ, रुमैया, मिथून चक्रवर्ती थे.
३७) सन् १९८९ में राजकुमार कोहली के इस फिल्म में मिथून चक्रवर्ती, निनाशी शेषांद्री और डिम्पल कपाडिया थे.

उभे संकेत

१) आवारा पागल (फिल्म)
२) सन् १९८१ में टिनु आनंद के इस फिल्म में अमिताभ बचन, परवीन बॉबी, अमजद खान थे.
४) इस फिल्म में कुलभुषन खरबंदा का नाम शाकाल था.
५) सुल्तान (फिल्म)
६) हम दिल दे चुके (फिल्म)
८) सन् १९८१ में लावारीस इस फिल्म की नायीका.
९) सन् १९९५ में कुकु कोहली के इस फिल्म में अजय देवगन, तब्बू थे.
१०) मंगेशकर (गायीका)
११) अभिषेक बचन, हृषीता भट्ट, दारासिंह अभिनीत एक फिल्म.
१३) सन् १९९७ में निर्माता राकेश रोशन के इस फिल्म में शाहरुख खान, माधूरी दीक्षीत थे.
१५) सोनु निगम की एक फिल्म.
१७) सारी दुनिया का बोझ हम उठाते है, लोग नाते है लोग जाते है.... यह गाना इस फिल्म का है.
१८) प्रतिभा सिन्हा की नायीका माँ.
२३) सन् १९९९ में श्रीकांत शर्मा के इस फिल्म में अक्षय खन्ना, मनिषा कोईराला थे.
२४) मुनीम (नायीका)
२५) सन् १९९४ में फरोग सिद्दीकी के इस फिल्म में अजय देवगन और तब्बू थे.
२६) सन् १९९५ में निर्माता प्रेम लालवानी के इस फिल्म में शाहरुख खान, मनिषा कोईराला थे.
२८) कपूर (नायक/निर्माता)
३१) मंजीले अपनी जगह है रास्ते अपनी जगह.... यह गाना इस फिल्म का है.
३३) अपून बोला तु मेरी लैला.... यह शाहरुख खान ने गाया गीत इस फिल्म का है.
३४) युक्ता मुखी की पहली फिल्म.
३५) कर दी आपने (फिल्म)

आमदार संग्राम जगताप यांच्या पाठिशी उभे राहून शिवसैनिक विजयाचा आनंदोत्सव साजरा करणार

सचिन जाधव यांचे प्रतिपादन

शहरातील तुषार गार्डन मध्ये शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. याप्रसंगी उपस्थित असलेले महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप. समवेत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, सचिन जाधव आदी पदाधिकारी.

नगर – फक्त लाडकी बहिणी योजना नव्हे, तर अनेक कल्याणकारी योजना राबवून महायुती सरकारने कल्याणकारी राज्ये चालवले. विरोधकांनी फक्त महायुतीवर आरोप करण्याचे काम केले. जनता सुज्ञ असून, त्यांना आपले कल्याणकारी हित कशात आहे? हे समजणार आहे. शहरात देखील आमदार संग्राम जगताप यांनी मोठ्या प्रमाणात राज्य सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी आणून विकास कामे केली. शिवसैनिकांची विकासाला साथ राहणार असून, जगताप यांच्या पाठिशी उभे राहून विजयाचा आनंदोत्सव साजरा करणार असल्याचे शहर प्रमुख सचिन जाधव यांनी सांगितले.

शहरातील तुषार गार्डन मध्ये शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. बैठकीप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, नगरसेवक सुभाष लोंढे, माजी उपमहापौर गणेश भोसले, हमाल पंचायत अध्यक्ष अविनाश घुले, अनिल लोखंडे, काशिनाथ दाते, भिंगार शहर प्रमुख सुनिल लालबोंढे आदींसह सर्व पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, खऱ्या शिवसैनिकांच्या माध्यमातून विजयाचा गुलाल अंगावर पडणार आहे. सध्या ऑक्टोबर हिटमध्ये थंडी, ऊन, वाऱ्यासारखे उमेदवारी अर्ज दाखल झालेले असून, हे क्षणिक असलेले वातावरण आहे. वर्षानुवर्षे नगरकारांच्या सेवेत असतांना अनेक विकास कामे करण्यात आली आहे. मतदार संघातील कोणताच परिसर शिल्लक नाही, की जेथे विकास कामाच्या माध्यमातून मी पोहोचलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर शहरात काल्पनिक चित्र रंगवण्याचे प्रकार सुरू आहेत. सर्वसामान्य नागरिकांनी देखील या काल्पनिक कथांचा आनंद लुटावा, मात्र या काल्पनिक गोष्टींना कोणताही ठोस पुरावा नाही. अनेकांचे भाषण देखील एंटरटेनमेंट स्वरूपाचे झालेले असल्याचा आरोप केला. आमदार असताना सातत्याने शहराच्या विकासासाठी व जनसेवेसाठी कार्य केले असून, याची पोचपावती विजयाच्या माध्यमातून नगरकर देणार असल्याची भावना जगताप यांनी व्यक्त केली.

जिल्हा प्रमुख अनिल शिंदे म्हणाले की, शहरासह जिल्ह्यात महायुतीच्या उमेदवारांच्या पाठिशी शिवसेना ठामपणे उभी राहणार आहे. महायुतीचा धर्म पाळला जाणार असून, पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेत आणण्यासाठी जनतेने निवडणूक हातात घेतली आहे. महायुती सरकारने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या जनकल्याणकारी कामाचे प्रतिबिंब या निवडणुकीत मतांच्या रुपाने उमटणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रोजगारच्या संधीसाठी समर्थ प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

रोजगारच्या संधीसाठी समर्थ प्रकल्प सुरू

सीएसआर फंडाच्या आर्थिक साह्याने राह फाउंडेशन व सेवा फाऊंडेशनचा उपक्रम

नगर – एंजेल वन यांच्या सीएसआर फंडाच्या आर्थिक साह्याने राह फाउंडेशन व सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नगर शहरात समर्थ प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २०० हून अधिक युवक युवतींना प्रशिक्षण देऊन रोजगारची संधी उपलब्ध करून देत आहे. २३ ऑक्टोबर रोजी बॅच ७ च्या प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम पार पडला त्यामध्ये ३३ युवक युवतींना प्रमाणपत्र देण्यात आले प्रमाणपत्र वाटपासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद, राह फाउंडेशनचे सागर मोरे, किड्स क्लासेसचे कैवल्य देशमुख, कार्यालय प्रमुख रियाज मुलानी, श्रुतिका शिरसाट, पूजा कुरणे आदी उपस्थित होते.

समर्थ प्रकल्पामध्ये ३५ दिवसाच्या कौशल्य प्रशिक्षणामध्ये किरकोळ व मार्केटिंग कौशल्य, टॅली, जीएसटी, मायक्रोसॉफ्ट वर्ड ऑफिस सूट डॉक्युमेंटेशन, फाइलिंग, सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, वैयक्तिक विकासासाठी जीवन कौशल्ये व उद्योगासाठी आवश्यक कौशल्ये, इंग्रजी बोलणे, आत्मविश्वास वाढवणे व लोकांमध्ये सुशिक्षित बोलणे इत्यादी द्वारे युवक युवतींना सक्षम करून त्यांना रोजगारची संधी उपलब्ध करून दिली जाते या प्रशिक्षणामध्ये १० वी १२ वी पदवीधर उच्च पदवीधर १८ ते २५ वयोगटातील युवक युवती प्रशिक्षण घेऊ शकतात अधिक माहितीसाठी साई पॅलेस दुसरा मजला आकाशवाणी केंद्र समोर प्रोफेसर चौक सावेडी मोबाईल नं. ८३२९०३०४३० / ९३०७६७०८२६.

जो हिंदू हित की बात करेगा वही, देश पे राज करेगा

शिरीष महाराज मोरे यांचे प्रतिपादन; प्रबोधन मंच व संत संपर्क विभाग आयोजित जिल्ह्यातील प्रमुख संत, प्रवचनकार यांच्या उपस्थितीत संत संमेलन

संत संमेलनात मार्गदर्शन करताना जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिरीष महाराज मोरे. समवेत तारकेश्वर गडाचे महंत हभप आदिनाथ शास्त्री महाराज, जिल्हा कार्यवाह हिरामकांत रामदासी आदी.

नगर – महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज, नामदेव महाराज, ज्ञानेश्वर माऊली, संत एकनाथ महाराज यांनी मुगली आक्रमणाच्या काळात धर्म टिकवण्यासाठीचे महान कार्य केले आहे. हिंदूंनी धर्म वाचविण्यासाठी हिंदुनाच मतदान करावे. जो हिंदू हित की बात करेगा वही, देश पे राज करेगा. जो जो भगव्याला विरोध करेल. त्याला गाडण्याचे सामर्थ्य संत म्हणून आपण ठेवतो. आम्ही आमची ताकद दाखवले नाही तर भविष्यात हिंदूंचे रक्षण करण्यासाठी कोणीही उभे राहणार नाही. जे जे हिंदूत्वासाठी उभे राहतील त्यांच्या पाठीशी संत म्हणून महाराज, किर्तनकार, प्रवचनकार, सामान्य वारकरी म्हणून देवाचा भक्त म्हणून उभे राहणे आपले कर्तव्य आहे. जोपर्यंत आपण धर्म सर्वश्रेष्ठ मानत नाही. तोपर्यंत आपण धर्माचे रक्षण करू शकत नाही. बांग्लादेशातील हिंदू समाजावर व महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले गेले. ते महाराष्ट्रात व भारतात होऊ नये. यासाठी हिंदूंनी एक व्हावे. जात धर्मापेक्षा मोठी झाली तर धर्म संपल्याशिवाय राहणार नाही. जातीच्या अगोदर जो शब्द लागतो तो हिंदू. धर्म टिकविण्यासाठी जातीचा त्याग करून हिंदूत्वाचा स्वीकार करावा लागेल. या कामी सर्व संत समाजाने पुढाकार घ्यायला हवा, असे प्रतिपादन राष्ट्रसंत जगद्गुरु तुकोबारायांचे वंशज शिरीष महाराज मोरे यांनी केले आहे.

टिळकरोड येथील पटेल मंगल कार्यालय, पटेलवाडी येथे प्रबोधन मंच व संत संपर्क विभागाच्या वतीने आयोजित संत संमेलनास नगर तालुका, शेवगाव, पाथर्डी, जामखेड, कर्जत, श्रीगोंदा, पारनेर येथील प्रमुख संत कीर्तनकार, प्रवचनकार,समाज प्रबोधनकार उपस्थित होते. यावेळी राष्ट्रसंत जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प.शिरीष महाराज मोरे, तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प.आदिनाथ शास्त्री महाराज व दक्षिण नगर, दक्षिण अहिल्यानगर संत संपर्क विभागाचे संयोजक अनिल रामदासी, हभप अमोल महाराज सातपुते, हभप भाँगताई, हभप स्मेश आप्पा महाराज, हभप गोविंद महाराज जाटदेवळेकर, हभप तात्या क्षीरसागर, हभप पोपट महाराज कातोरे, हभप राहुल महाराज दरंदले, हभप राम महाराज झिंजुरके, हभप गोरे महाराज, हभप मंदार बुवा रामदासी, हभप अनिल महाराज वाळके, यशवंत महाराज थोरात, हभप महेश महाराज आगळे, हभप ज्ञानेश्वर महाराज वेताळ, हभप कृष्ण महाराज सातपुते आदी उपस्थित होते.

आदिनाथ शास्त्री महाराज आशीर्वचन देताना म्हणाले, धर्म टिकला तरच कीर्तन, प्रवचने, सप्ताह होतील धर्मासाठी आपापसातील द्वेष मच्छर भावना दूर ठेवली पाहिजे. आपण हिंदू धर्माचे पाईक आहोत. छत्रपती धर्मवीर संभाजी महाराजांनी धर्मासाठी बलिदान केले आहे. आपणही धर्मासाठी प्रापंचिक सुखाचा व वैयक्तिक स्वार्थाचा त्याग करू शकत नाही का? आपण एकाच मातीत व देशात राहतो. हम तो हमारे दो असे असताना तिसरे अपत्य झाले तर तो कोणत्याही धर्माचा असो. त्याला निवडणूक लढविता येत नाही. तिसरे अपत्य होणाऱ्यालाच मतदानाचा अधिकार देऊ नये.

हिरामकांत रामदासी प्रास्ताविकात म्हणाले, आपण राहतो त्या भागामध्ये जिथे शक्य होईल तिथे आपण एकत्र येऊन धर्मासाठी राष्ट्र हितासाठी एकत्र यावे व मतदान करावे. असे आवाहन केले. येत्या चार तारखेला लोकजागर अभियानाच्या माध्यमातून घरोघरी पत्रके वाटप करून समाज जागृती करण्यात येणार आहे. १००% मतदानासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मतदान करताना जो कोणी हिंदुत्वाचे काम करेल त्यासाठी आपण मतदान करावे.

सूत्रसंचलन जामखेड तालुक्याचे हनुमंत महाराज निकम यांनी केले. आभार हभप संदीप महाराज खोसे यांनी मानले.

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

- चेहऱ्यावरील रग्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
- पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
- डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

- सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध
- सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोराघटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

Green Library
INTRODUCING ALL NEW
INDOOR LANDSCAPE DESIGNERS
For Your Beautifully Designed Home with a Touch of Nature
Live Plants | Garden Accessories | Green Library
Premium Planters | Artifacts on Lease | Garden Furniture
For Site visit call Amit Sanklecha 99231 43334
Opp. Ramadevi Temple, Next to Komada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, Ahmednagar - 414003 99231 43334

ब्ल्यु जेम फाउंडेशनच्यावतीने आयोजित 'बहार शॉपिंग फेस्टिवल' प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉक्टर पद्मजा गरुड.

ब्ल्यु जेम फाउंडेशनच्यावतीने 'बहार शॉपिंग फेस्टिवल' प्रदर्शन

नगर – ब्ल्यु जेम फाउंडेशनच्या वतीने आयोजित बहार शॉपिंग फेस्टिवलच्या प्रदर्शनाला ग्राहकांना दिवाळी सणासाठी लागणाऱ्या विविध वस्तू, उत्पादने आणि फराळाची खरेदी एकाच ठिकाणी करता आली. ही एक मोठी सोय ग्राहकांसाठी निर्माण करून दिली. या प्रदर्शनात २५ वेगवेगळ्या महिला उद्योजिकांना त्यांच्या उत्पादनासाठी हक्काची बाजारपेठ मिळवून देऊन फाउंडेशनच्या महिला सक्षमीकरणाच्या चळवळीला मोठी चालना मिळाली आहे, असे उद्गार डॉक्टर पद्मजा गरुड यांनी बहार प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी काढले.

सावेडीतील, देशबंधू रावसाहेब पटवर्धन स्मारक येथे बहार शॉपिंग फेस्टिवलच्या उद्घाटन प्रसंगी डॉक्टर पद्मजा गरुड बोलत होत्या. यावेळी परिसरातील नगरसेवक मनोज दुलम, डॉ. प्रकाश गरुड, देशभक्त रावसाहेब पटवर्धन यांच्या विश्वस्त सौ. शोभा ढेपे, ज्येष्ठ रंगकर्मी सविता जोशी, राजेश परदेशी, शुभम जोशी, साजरी परदेशी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात ब्ल्यु जेमच्या अध्यक्षा निलम परदेशी यांनी बहार फेस्टिवल महोत्सवाच्या आयोजना मागील हेतू विषद केला. यावेळी ब्ल्यु जेमच्या वतीने प्रदर्शनाला भेट देणाऱ्या ग्राहकांची मोफत हिमोग्लोबिनची तपासणी केल्याबद्दलस सौ. शोभा ढेपे यांनी ब्ल्यूजेम फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक आपल्या भाषणातून केले.

नगरसेवक मनोज दुलम यांनी या प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व उद्योजकांचे कौतुक करत, यातूनच भविष्यात मोठ्या उद्योजिका निर्माण होतील असा विश्वास व्यक्त केला. दिवसभराच्या प्रदर्शनास उपस्थिती दर्शविणाऱ्या ग्राहकांमधून सायंकाळी लकी ड्रॉ काढण्यात येणार असल्याचे सांगून ब्ल्यु जेम फाउंडेशनच्या सहसचिव लाजरी परदेशी – जोशी यांनी आभार मानले.

दिवाळीनिमित्त फ्रेश स्टॉक
महावीर मॉल... स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी कराऱ्या ग्राहकांचीच कृपया मॉलला भेट द्यावी.
लहान मुलांचे फॅन्सी जोधपूरी, सूट, इंडो वेस्टर्न, कुर्ता, मोदी जॅकेट ड्रेस, इंपोर्टेड टीशर्ट शर्ट, अरमानी पँट सर्व साईझमध्ये उपलब्ध. (ब्लँकेट, बेडशीटमध्ये ४० नमुने)

मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या.
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँक जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

नगर जिल्ह्यातील चष्मा व्यवसायाचे जनक

कै. डॉ. नारायणराव आडकर
यांच्या १०८ व्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन..
आडकर चष्म्यांचे तज्ज्ञ
८६ वर्षांची प्रदीर्घ नेत्रसेवा..
Eye Q Media
कापड बाजार कॉर्नर, अहमदनगर. फोन : ०२४१-२३५४३७७

दि : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 25 ऑक्टोबर ते 1 नोव्हेंबर 2024
VENOM THE LAST DANCE (HIN 3D) 10:00AM I 12:30PM I 03:00 PM 05:00PM I 08:00PM I 10:30 PM
PHULLWANT 12:05 PM I 05:00 Pm
JIGRA 09:00 AM I 02:30 PM 10:15 PM
RAJA RANI 08:00 PM
VICKY VIDYA KA WOH WALA VIDEO 06:15 AM I 02:00 PM I 10:30 PM
VETTAIYAN 11:00 AM I 07:15 PM
KARMAYOGI ABASAHEB 05:00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

COMING SOON
The Club Resort
* Lawns * Ac banquet * luxuries Room
* unique restorant * and many more ...
Address : Behind D.Mart, Hotel Nagri village, Ahilyanagar
9270570699

REVOLUTION in animation world
graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM



COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects
C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net
Duration : 6 Months

CERTIFICATE COURSE IN
SOFTWARE PROGRAMMING
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE

Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769

Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769

Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistabag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

दीपावलीला उजळू दे आकाश..
सर्वत्र पसरु दे लख्ख प्रकाश..
जुळावे नवे 'अर्थबंध'
हा एकच ध्यास

बँकेचे भागधारक, खातेदार,ठेवीदार व हितचिंतक सर्वांना
दीपावली व नूतनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

सुनिल पुराणिक – मुख्य कार्यकारी अधिकारी
अमित मुथा – व्हा. चेअरमन
हस्तीमल मुनोत – चेअरमन

संचालक मंडळ

अनिल पोखरणा, कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, संजय घोपडा, किशोर मुनोत, संजीव गांधी, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोर्टिबीरे, सुभाष भांड, सुभाष बायड
जितेंद्र बोरा (कर्मचारी प्रतिनिधी) ✲ प्रसाद गांधी (कर्मचारी प्रतिनिधी) ✲ नितीन भंडारी (जॉ. मुख्य कार्यकारी अधिकारी)
बोर्ड ऑफ मॅनेजमेंट – संजीव गांधी (चेअरमन), राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया व सर्व कर्मचारी वृंद

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.
मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...
प्रधान कार्यालय : प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ -२३२२२२२

कर्जावरील आकर्षक व्याजदर

स्वामिनी गृह कर्ज योजना	व्याजदर 6.50 %*
गृहनिर्माण कर्ज	गृहनिर्माण विस्तार - व्याजदर 7%*
टॉप-अप गृहनिर्माण कर्ज	व्याजदर 8%*
मालमत्तेवरील कर्ज	(किरकोळ तारण/व्यवसाय कर्ज)- व्याजदर 11.00%*
सोनेतारण कर्ज -	व्याजदर 8.00%*

ठेवीवरील आकर्षक व्याजदर
3 वर्षांपेक्षा जास्त ते 5 वर्षांपर्यंत 7.30% व्याजदर
ज्येष्ठ नागरिक 7.80% / सहकारी संस्था 7.30%
15 लाख व त्यापेक्षा जास्त मुदतठेवींना 0.25% जास्त व्याजदर
* नियम व अटी लागू.
शाखा : अ.नगर- दाळमंडई । मार्केट यार्ड । कापडबाजार । गुलमोहर रोड । चितळे रोड । एम.आय.डी.सी । तारकपुर जामखेड । छ.संभाजीनगर। पुणे । श्रीगोंदा । शेवगाव । पाथर्डी । सोनई । घोडनदी । कडा । छ.संभाजीनगर (गोंदा) । नारायणगाव

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे
तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा,
यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323

-|| पाचवे स्मृतीदिन ||

स्व. अक्षय शरद नरसाळे
स्व. दि. ३१/१०/२०१९
साथ सुटली लाख मोलाची
छाया विरली, आपल्या मायेची...
ज्योत विझली आशेची
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण आदरांजली...
- दुःखांकित -
We Secure Your World
SaiTech CORPORATION
समस्त नरसाळे परिवार
साईटेक कॉर्पोरेशन परिवार

लक्झरियस 2BHK FLATS बुकिंग सुरु
रेडीपझेशन
मीना अपार्टमेंट तुमच्या मनातील सुंदर गृहविश्व
काम मजबुत, वाजवी किंमत, व्यवहारात पारदर्शकता
साईट पत्ता शास्त्रीनगर, रेणुकामाता मंदिराजवळ, केडगाव, अहमदनगर
✲ अधिक माहितीसाठी संपर्क ✲
मोहन लाड 7588093697
मेजर अशोक लाड 7588695802
आदित्य सोनवणे 9730969093
रुद्र बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स
शास्त्रीनगर, रेणुकानगर मंदिराजवळ, केडगाव, अहमदनगर

१२ वे पुण्यस्मरण

कै. सुरेखा अविनाश दळवी
(स्वर्गवास दि. १३/११/२०१२ (लक्ष्मीपुजन)
आठवण तुझी प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला.. आज जरी नाही
तु आमच्यात, सदैव राहतील तुझ्या
आठवणी आमच्या मनात..
✲ दुःखांकित ✲
अविनाश रामदास दळवी
मयुर अविनाश दळवी । सौ. सोनल मयुर दळवी
संदिप अरुणशेठ बोराटे । सौ. स्नेहा संदिप बोराटे
कु.तनिष्का । कु.श्रिक्षा । कु.अधिराज
समस्त दळवी परिवार

"आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात.."

कै. बबनराव (आण्णा) शेळके
स्वर्गवास दि. ३१/१०/२०१३

भावपूर्ण श्रद्धांजली
कै. बबनराव (आण्णा) शेळके
११ वे पुण्यस्मरण
गुरुवार दि. ३१/१०/२०२४ रोजी सकाळी १० वा.
स्थळ : थिटेसांगवी, ता. श्रीगोंदा, जि.अ.नगर
✲ शोकांकुल ✲
गं.भा. प्रमिला बबनराव शेळके (पत्नी)
श्री. शिवाजी बबनराव शेळके (मुलगा)
श्री. संग्राम बबनराव शेळके (मुलगा)
सौ. छाया संतोष झिने (मुलगी)
श्री. संतोष गंगाधर झिने (जावई)
समस्त शेळके परिवार
ह.भ.प. सिध्दीनाथ मेटे महाराज यांचे प्रवचन होईल.